रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक १६७
www.ramprahar.com
गुरुवार, २ जानेवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## केंद्राकडून नववर्षानिमित्त शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे निर्णय



**नवी दिल्ली :** केंद्राने नव्या वर्षाच्या सुरुवातीला मोठे गिफ्ट जाहीर केले आहे. केंद्र सरकारच्या कॅबिनेटमध्ये अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत पंतप्रधान पीक विमा योजना आणि हवामान आधारीत पीक विमा योजनेला २०२५-२६ पर्यंत सुरू ठेवण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यासाठी ६९५१५ कोटी रुपये देण्यात आले आहेत. तसेच ५० किलोच्या डीएपीच्या बॅगेवर अतिरिक्त सबसिडी देण्यात आली आहे. यासाठी ३८५० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली आहे. पीक विमा योजनेत वेगाने पंचनामे, विमा परतावा आदी बाबींसाठी ८०० कोटी रुपये देण्यात आले आहेत. तसेच ही प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल करण्याचा निर्णय घेतला आहे.

अंतरंग
बोरघाटात मोटरसायकल अपघातात तिघे जखमी/२
पनवेल मनपाचा प्रदूषण नियंत्रणावर भर/३
'श्री तीर्थक्षेत्र महादेव मंदिर परिसर विकसित करणार'/५

### पनवेलमध्ये वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे लोकार्पण

# आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी लोकसेवक

■ मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांचे गौरवोद्गार





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या रूपाने लोकांची अहोरात्र सेवा करणारे नेते मिळाले आहेत आणि ते पनवेल उरण रायगडचे भाग्य असून हे दोन्ही आमदार लोकसेवक आहेत, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी बुधवारी (दि.१) येथे केले. महाराष्ट्रातील हे पहिले वैद्यकीय सहाय्यता कक्ष असून अशाचप्रकारे राज्यभरात वैद्यकीय सहाय्य कक्ष उभारणार असल्याचे त्यांनी या वेळी नमूद केले.

केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध वैद्यकीय योजना तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचा मदतनिधी पनवेल व उरण तालुक्यातील आदिवासी, गरीब, गरजू नागरीकांपर्यंत पोहोचवून त्यांच्या निरोगी आणि दीर्घायु जीवनासाठी भारतीय जनता पार्टी पनवेल आणि उरण विधानसभा मतदार संघाच्या वतीने पनवेल भाजप कार्यालय येथे वैद्यकीय सहाय्यता कक्ष उभारण्यात आले आहे. या मध्यवर्ती कार्यालयाचा लोकार्पण सोहळा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते व मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

> *पनवेल आणि उरण विधानसभा क्षेत्रातल्या नागरिकांना वैद्यकीय मदतीसाठी हे वैद्यकीय सहाय्य कार्यालय सदैव कटिबद्ध आहे. मोफत आणि स्वस्तात स्वस्त दरात वैद्यकीय उपचार व्हावेत यासाठी हे कार्यालय रुग्णांना मदत करणार आहे. त्याचबरोबर वैद्यकीय सुविधा कोणकोणत्या आहेत याची माहितीही या कार्यालयातून नागरिकांना मिळणार असून आगामी काळात आरोग्य महाशिबिरे आयोजित करणार आहोत.*
>
> **-आमदार महेश बालदी**

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, पनवेल शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, दिबासाहेबांचे चिरंजीव अतुल पाटील, उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, खालापूर तालुकाध्यक्ष प्रवीण मोरे, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, पनवेलचे माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, उरणच्या माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे, माजी नगरसेवक संतोष भोईर, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, प्रभाकर जोशी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. (पान २ वर..)

# गडचिरोलीची विकासात्मक वाटचाल सुरू राहणार -मुख्यमंत्री फडणवीस

**गडचिरोली : प्रतिनिधी**

नववर्षाचा पहिला दिवस गडचिरोलीसाठी विकासाची नवीन पहाट घेवून आला असून विकासाच्या, सामाजिक सलोख्याच्या, शांततेच्या आणि औद्योगीकरणाच्या दिशेने गडचिरोलीची वाटचाल सुरू राहील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि.१) येथे व्यक्त केला.

नवीन वर्षाचा पहिला दिवस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्यात व्यतित केला. त्यांच्या उपस्थितीत जहाल नक्षली ताराक्कासह ११ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. देशाच्या स्वातंत्र्यानंतर ७७ वर्षांत प्रथमच अहेरी ते गर्देवाडा अशी बससेवेचा त्यांनी शुभारंभ केला आणि त्या बसमधून प्रवासही केला. लॉईडच्या विविध उपक्रमांचा त्यांनी शुभारंभ केला. यातून ६२०० कोटींची गुंतवणूक होत असून, चार हजारावर रोजगारनिर्मिती होते आहे.

### स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच धावलेल्या बस मार्गाचे उद्घाटन



बुधवारी सकाळी गडचिरोली जिल्ह्यात आगमन झाल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे थेट ताडगुडा ब्रीज येथे गेले. गट्टा-गर्देवाडा-वांगेतुरी मार्ग तसेच ताडगुडा पुलाचे त्यांनी लोकार्पण केले. पेनगुंडा येथे त्यांनी जवानांशी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला. कोनसरी येथे, लॉईड्सच्या विविध उपक्रमांचा त्यांनी शुभारंभ केला. लॉईडस काली अम्मल हॉस्पीटल आणि लॉईडस राज विद्यानिकेतन सीबीएसई शाळेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. पोलिसांसाठी निवासस्थाने, जिमखाना, बालोद्यान इत्यादींचेही लोकार्पण करण्यात आले. गडचिरोलीत ग्रीन माईनिंगचाही शुभारंभ करण्यात आला. ग्रीन माईनिंगचा प्रयोग देशातून गडचिरोलीत प्रथमच राबविण्यात येत आहे, अशीही माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी दिली.

## भीषण अपघातात कुटुंबातील चौघे ठार

■ सोलापूर-धुळे मार्गावरील घटना



**सोलापूर : प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यामधील सोलापूर धुळे महामार्गावर महाकाळामध्ये उभ्या असलेल्या आयशर ट्रकला मागून स्कॉर्पिओ कार धडकून झालेल्या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील चौघेजण जागीच ठार झाले. दोघेजण गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. बुधवारी (दि.१) दुपारी साडेबारा वाजेच्या दरम्यान हा अपघात झाला.

सोलापूर धुळे महामार्गावर महाकाळामध्ये आयशर ट्रकला बीडकडून संभाजीनगरकडे जाणाऱ्या कारने पाठीमागून जोराची धडक दिल्याने हा भीषण अपघात झाला. दरम्यान, घटनास्थळी जालन्यातील गोंदी पोलीस दाखल झाले. या अपघातात जखमी झालेल्यांना छत्रपती संभाजीनगर येथे पुढील उपचारासाठी हलवण्यात आलं आहे.

दरम्यान, स्कॉर्पिओ आणि आयशर ट्रकच्या भीषण अपघातात अक्कलकोट तालुक्यातील चार भाविक जागीच ठार झाले, तर सात जण जखमी झाले. नवीन वर्षानिमित्त देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांवर वाटेतच काळाचा घाला पडला आहे. अक्कलकोटमध्ये दर्शन घेऊन गणगापूरकडे निघाले असताना भाविकांच्या गाडीचा अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथे अपघात झाला. आज सकाळी ७ च्या सुमारास झालेल्या अपघातात दोन महिला आणि दोन पुरुष जागीच ठार झाले.

सर्व भाविक नांदेड जिल्ह्यातील असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. अपघातस्थळी अक्कलकोट पोलीस दाखल झाले. जखमींना तातडीने अक्कलकोट सार्वजनिक रुग्णालयात करण्यात आले आहे.

### कामोठ्यात खळबळ

## घरामध्ये आढळला मायलेकाचा मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील कामोठे वसाहतीमध्ये एका राहत्या घरामध्ये बुधवारी (दि.१) वृद्ध आईसह तिच्या मुलाचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

कामोठे वसाहतीमधील रूम नंबर १०४, ड्रीम हौसिंग सोसायटी, सरोवर हॉटेलच्या बाजूला, सेक्टर ६ ए, कामोठे येथील एका बंद रुममध्ये आई व मुलाचा मृतदेह आढळून आला आहे. या संदर्भात बुधवारी दुपारी त्यांचे नातेवाईक घराचा दरवाजा ठोठावत असताना आतून दरवाजा उघडला न गेल्याने त्यांनी पोलीस कंट्रोल येथे तसे फायर ब्रिगेड येथे संपर्क साधून याबाबतची माहिती दिली. त्यानुसार कामोठे पोलिसांचे पथक व फायर ब्रिगेडने दरवाजा तोडून आत प्रवेश केला असता आतमध्ये गॅस सदृश्य वास येत असल्याचे प्राथमिक दिसून आले व त्या रुममध्ये राहणाऱ्या गीता भूषण जग्गी (वय ७०) व तिचा मुलगा जितेंद्र भूषण जग्गी (वय ४५) हे मृत अवस्थेत मिळून आले आहेत. पुढील तपास कामोठे पोलीस करत आहेत.

# नागपूर, लखनऊ हत्याकांडाने हादरले

## रागाच्या भरात मुलाने आई-वडिलांना संपवले

**नागपूर : प्रतिनिधी**

नागपूर शहर पुन्हा एकदा खुनाच्या घटनेने हादरले आहे. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी नागपूरात दुहेरी हत्याकांड झाल्याची घटना उघड झाली आहे. यात चक्क पोटच्या मुलाने आई-वडिलांची हत्या केली आहे. नागपूरच्या कपिल नगर पोलीस ठाण्यातर्गत खसाळा कॅम्पसमध्ये ही घटना घडली आहे. लीलाधर डाखोडे आणि अरुणा डाखोडे अशी मृतांची नावे असून आरोपी हा त्याचाच मुलगा उत्कर्ष डाखोडे आहे.



मृतक लीलाधर हे कोराडी थर्मल प्लांटमध्ये तंत्रज्ञ म्हणून काम करतात. तर अरुणा विनोबा भावे नगर येथील एका खाजगी शाळेत प्राथमिक शिक्षिका होत्या. आरोपी उत्कर्ष हा सहा वर्षांपासून अभियांत्रिकीचे शिक्षण घेत होता. वारंवार अपयश आल्याने उत्कर्षच्या पालकांनी अभ्यास सोडून शेती करण्याचा सल्ला देत होते, पण उत्कर्ष अभियांत्रिकी पूर्ण करण्याच्या त्याच्या आग्रहावर ठाम होता. मात्र आरोपी उत्कर्षला एमडीचे व्यसन होते आणि या व्यसनामुळे त्याला अभ्यास करता येत नव्हता. आई-वडिलांच्या सततच्या समजुतीमुळे तो चिडला आणि रागाच्या भरात त्याने आपल्या आई-वडिलांची हत्या करण्याचा घातक प्लॅन तयार केला.

पुढे आलेल्या माहितीनुसार, उत्कर्षने फ्लॅननुसार २६ डिसेंबरला सकाळी आपल्या धाकटी बहीण सेजल हिला कॉलेजला सोडले होते. बहिणीला कॉलेजला सोडल्यानंतर खासाळ येथील आपल्या घरी पोहोचला, तिथे १ वाजताच्या सुमारास त्याने आधी आई अरुणाचा गळा आवळून खून केला. त्यानंतर वडील ड्युटीवरून घरी पोहचल्यानंतर धारदार शस्त्राने वार करून त्यांचीही हत्या केली. दोन्ही हत्या केल्यानंतर आरोपीने घराला कुलूप लावून वडिलांची गाडी आणि मोबाईल फोन कोराडी येथे राहणाऱ्या मामाकडे नेला आणि तेथून आपल्या बहिणीला फोन करून सांगितले की, तो काही दिवसांसाठी ध्यान करायला बंगलोरला जात आहे व बहिणीला काकाकडे सोडून दिले.

उत्कर्ष मंगळवारी रात्री त्यांच्या घरी आला आणि त्याने जोरात दरवाजा ठोठावण्याचा बहाणा केला. त्यानंतर बुधवारी सकाळी ते पुन्हा कोराडीला काकांकडे झोपायला गेले असता, शेजाऱ्यांना उग्र वास येऊ लागल्याने त्यांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी दरवाजा तोडून आत तपासले असता घरभर रक्ताने माखलेले अरुणा व लीलाधर यांचे मृतदेह आढळून आले. प्राथमिक तपासादरम्यानच खून झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती, त्यामुळे पोलिसांनी उत्कर्षला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली असता, त्याने आपल्या आई-वडिलांची हत्या केल्याची कबुली दिली. पोलिसांनी उत्कर्षला अटक केली असून पोलीस घटनेचा पुढील अधिक तपास आहे.

## चार बहिणींसह आईची हत्या; मुलाला अटक, वडील फरार

**लखनऊ : वृत्तसंस्था**

नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशी लखनऊ शहर हत्याकांडाने हादरले आहे. उत्तर प्रदेशच्या लखनऊ शहरातील एका हॉटेलमध्ये एकाच कुटुंबातील पाच जणांचे मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. यामध्ये चार बहिणी आणि त्यांच्या आईचा समावेश आहे. या प्रकरणात पोलिसांनी २४ वर्षीय मुलाला अटक केली आहे.

दरम्यान, हे कौटुंबिक वादातून या पाच जणांची हत्या करण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. या घटनेप्रकरणी पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीचे नाव अर्शद आहे.

उत्तर प्रदेशातील आग्रा येथील एका कुटुंबातील पाच सदस्य बुधवारी लखनऊ शहरातील नाका परिसरात असणाऱ्या एका हॉटेलमध्ये मृतावस्थेत आढळून आले. या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. यानंतर पोलिसांनी या घटनेचा तपास सुरू केला. या मृतांमध्ये ४९ वर्षीय एक महिला आणि तिच्या चार मुलींचा समावेश आहे. या महिलेचे नाव अस्मान असे आहे, तर अलिशिया (वय १९), रहमीन (वय १८), अक्ष (वय १६) आणि आलिया (वय ९) अशी या घटनेतील चार मुलींचे नाव असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या घटनेप्रकरणी पोलिसांनी अस्मानचा मुलगा अर्शद (वय २४) याला अटक केली आहे. अर्शदसह त्याच्या वडिलांचाही सहभाग असल्याचा पोलिसांना संशय आहे. कारण ही घटना घडल्यानंतर अर्शदचे वडील फरार झाले आहेत. त्यामुळे पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे.

## निवडक

### अमेरिकेत दहशतवादी हल्ला; १२ लोकांचा मृत्यू

**वॉशिंग्टन :** अमेरिकेच्या न्यू ऑर्लियन्स शहरात भयंकर हल्ला झाला असून, यामध्ये किमान १२ जणांचा मृत्यू आणि ३० लोक जखमी झाले आहेत. हल्लेखोराने न्यू ऑर्लिन्समधील बोर्बन स्ट्रीटवर गर्दीत ट्रक घुसवला व नंतर वाहनातून बाहेर पडून गोळीबार करू लागला. याबाबत न्यू ऑर्लियन्स शहर पोलिसांनी माहिती दिली आहे. एफबीआय आणि पोलीस संयुक्तपणे या हल्लामागे काय हेतू आहे याचा शोध घेण्यासाठी वाहनाची तपासणी करत आहेत.

### संतोष देशमुख हत्या प्रकरणात एसआयटी स्थापन

**बीड :** बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाने संपूर्ण राज्यात संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी अशी मागणी सर्व स्तरातून केली जात आहे. यादरम्यान महाराष्ट्र सरकारने मोठा निर्णय घेत सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या तपासासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केली आहे. या प्रकरणात आरोप होत असलेल्या वाल्मिक कराडला १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# जीएसटी संकलनाचा टक्का वाढला

■ १.७७ लाख कोटी रुपये सरकारी तिजोरीत जमा




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

२०२४ या वर्षाच्या अखेरच्या महिन्यात केंद्र सरकारच्या तिजोरीत लाखो करोड रुपये जीएमटीच्या माध्यमातून जमा झाले. १ जानेवारी रोजी सरकारने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, डिसेंबरमध्ये सकल जीएसटी संकलन ७.३ टक्क्यांनी वाढून १.७७ लाख कोटी रुपयांवर पोहचले आहे.

वस्तू आणि सेवा कर महसूल डिसेंबरमध्ये ७.३ टक्क्यांनी वाढले आहे. १.७७ लाख कोटी जीएसटी सरकारच्या तिजोरीत जमा झाला आहे. गेल्यावर्षी म्हणजे डिसेंबर २०२३ मध्ये १.६५ लाख कोटी जीएसटीच्या माध्यमातून जमा झाले होते. याच महिन्यात घरगुती व्यवहारातील जीएसटी कर ८.४ टक्क्यांनी वाढला असून, १.३२ लाख कोटींवर गेला आहे. आयातीवरील जीएसटी चार टक्क्यांनी वाढला असून, ४४,२६८ कोटी रुपयांवर पोहोचला आहे.

डिसेंबर २०२४ मध्ये २२,४९० कोटी रुपये परतावा जारी करण्यात आला आहे. ही रक्कम मागील वर्षीच्या (२०२३) तुलनेत ३१ टक्के जास्त आहे. नोव्हेंबरमध्ये (२०२४) जीएसटी कलेक्शन ८.५ टक्के वार्षिक वाढीसह १.८२ लाख कोटी रुपये राहिले. आतापर्यंतचे सर्वात जास्त जीएसटी संकलन एप्रिल २०२४ मध्ये २.१० लाख कोटी झाले होते.

ऑक्टोबर २०२४मध्ये १.८७ लाख कोटी रुपये जीएसटी संकलन झाले होते. नऊ टक्क्यांसह वर्षातील ही दुसऱ्या क्रमांकावरील संकलन होते. जुनी अप्रत्यक्ष कर व्यवस्था बदलून जीएसटी लागू करण्यात आला. २०१७ मध्ये लागू करण्यात आलेला जीएसटी कायदा हा आतापर्यंतचा सर्वात कर सुधारणा कायदा म्हटला गेला.

## काशीद समुद्रात आणखी एका पर्यटकाचा बुडून मृत्यू

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड व काशीद समुद्रकिनारी थर्टी फर्स्ट साजरा करण्यासाठी पुणे येथून आलेल्या पर्यटक प्रतिक सहस्रबुद्धे यांना पाण्याचा अंदाज न आल्याने त्यांचा बुडून मृत्यू झाला. ही आठवड्यातील दुसरी घटना आहे.

पुण्यातुन थर्टी फर्स्ट साजरा करण्यासाठी भाडोत्री रिक्षा घेऊन प्रतिक सहस्रबुद्धे, गणेश सहस्रबुद्धे, रिक्षाचालक शदाब अविद मलीक, राकेश पवार हे चौघे मित्र फिरण्यास आले होते. दुपारच्या दरम्यान चौघे मित्र समुद्राच्या पाण्यात पोहण्यास उतरले होते. स्पोर्ट्स बाईकवर फिरायला जाताना तीन मित्र पैसे आणण्याकरिता बाहेर आले तेव्हा प्रतिक सहस्रबुद्धे हा पाण्यात पोहत राहिले. तिघांना वाटले की प्रतिक ही पाण्यातुन बाहेर आला असेल आणि कुठे तरी फिरत असेल.

दिड तासानंतर प्रतिक सहस्रबुद्धे हा पाण्यात तरंगताना लाईफ गार्ड यांना दिसला ताबडतोब घटनास्थळी असलेले पोलिस व लाईफ गार्ड समुद्राच्या पाण्यात उतरून प्रतिक सहस्रबुद्धे यांना बाहेर काढण्यात आले. रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मयत असल्याचे सांगितले. या घटनेचा अधिक तपास हवालदार हरि मेंगाळ करीत आहेत.



**पनवेल : राजकीय, सामाजिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी दरवर्षीप्रमाणे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आर्शीवाद घेत नवीन वर्षाची सुरुवात केली.** (अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

# ग्रामीण भागातील रस्त्यांची कामे पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण करावी -मंत्री जयकुमार गोरे



**मुंबई : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून तयार करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामात पारदर्शक व गुणवत्तापूर्ण कामाला प्राधान्य द्यावे, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

मंत्रालयात प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या तसेच कंत्राटी कामगार वेतन थकबाकीबाबत आढावा बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे सचिव सतिश चिखलीकर, वित्तीय नियंत्रक अभय धांडे, उपसचिव प्रशांत पाटील, कार्यासन अधिकारी विवेक शिंदे, अच्युत इप्पर, विजय चौधरी उपस्थित होते.

ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे म्हणाले की, प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतील निकषात बदल करण्यासाठी केंद्र सरकारसोबत चर्चा करण्यात येईल, जेणेकरुन कामात सुलभता निर्माण होईल. ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे विस्तारण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्यात यावेत. ग्रामीण तसेच मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत पुढील कामे मंजूर करण्यासाठी बाह्य वित्तीय संस्थांकडून आर्थिक मदत घेण्याबाबत प्रयत्न करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. कंत्राटी कामगार वेतन थकबाकीसंदर्भातील आढावाही यावेळी घेण्यात आला.

## बोरघाटात मोटरसायकल अपघातात तिघे जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील बोरघाटात वाळक्याच्या मोरी जवळ मोटरसायकल स्वाराचे नियंत्रण सुटल्याने मोटरसायकल वाळक्याच्या मोरी मध्ये पडली आहे.

या अपघातात तीन जण जखमी झाले जखमींना खोपोली नगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले एकवीरा देवीचे दर्शन घेऊन बोरीवली - मुंबईकडे परतत असताना अपघात झाला. यामध्ये हर्षल शिंदे रा. कांदेवली, रुपाली पाल, सोनिया पाल रा. कांदिवली किरकोळ जखमी झाले. ही घटना सांयकाळी ५ वा सुमारास घडली. दुसरा अपघात सकाळी १० वा सुमारास मोटरसायकल स्वार भीमा कोरेगाव येथे जात असताना अंडा पॉईंट जवळ नियंत्रण सुटल्याने हाईट बॅरिकेड्स वर जाऊन आदळला. जखमीवर उपचार करून सोडून देण्यात आले.

## नो एन्ट्रीतून प्रवास करणाऱ्यांवर कर्जत पोलिसांकडून कारवाई; १८,५०० दंड वसूल

**कर्जत : प्रतिनिधी**

शहरात नो एन्ट्री मधुन प्रवास करणाऱ्यांवर कर्जत पोलिसांकडून कारवाई दंडात्मक कारवाई करण्यात आली असून दि.३० आणि ३१ डिसेंबर अश्या दोन दिवसात ३७ केसेस, करून १८,५०० दंड वसूल करण्यात आला आहे.

कर्जत शहरात होणाऱ्या वाहतूक कोंडीवर उपाययोजना करीत प्रशासनाकडून शहरात मुख्य बाजारपेठेत वन वे वाहतूक सुरू करण्यात आली आहे. वन वे वाहतूक सुरू केल्यापासून मोठ्या वाहनचालकांची बाजारपेठेत वाहन आणण्याची संख्या कमी झाली असल्याने वाहतूक कोंडी होत नसल्याचे दिसून येत आहे. मात्र तरीही काही दुचाकी वाहनचालक नो एंट्री मधून प्रवास करत आहेत.

कर्जत पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या मार्गदर्शनाखाली दि.३० आणि ३१ डिसेंबर रोजी वाहतूक पोलीस शाखेचे हवालदार सुरेश पाटील अणि बाबसू तिडके यांनी ही धडक कारवाई केली आहे. या कारवाईमध्ये नो एन्ट्री प्रवास करणाऱ्या वाहनचालकांचे लायसन तसेच वाहनांची इतर कागदपत्रे तपासण्यात आली आहे आहेत. या कारवाईमध्ये ३७ केसेस केल्या असून रुपये १८ हजार ५०० इतका दंड वसूल करण्यात आला आहे.



## धान खरेदीसाठी पोर्टलवर नोंदणीस मुदतवाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

शासकीय खरेदी केंद्रावर धान/भरडधान्य विक्रीसाठी शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य आहे. त्याकरिता ३१ डिसेंबरपर्यंतची मुदत होती. मात्र अनेक शेतकरी नोंदणीपासून वंचित असल्याने विविध लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार शासनाने नोंदणीसाठी १५ जानेवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ दिल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.



शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दर मिळू नये यासाठी महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून धान/ भरडधान्य खरेदी केले जाते. त्यासाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली आहे. खरीप पणन हंगाम २०२४-२५ मध्ये शेतकरी नोंदणीकरिता ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत अंतिम मुदत होती.

मात्र अनेक भागातील शेतकरी नोंदणीपासून वंचित असल्याने शासनाने नोंदणीसाठी मुदतवाढ द्यावी अशी मागणी अर्थ व नियोजन विभागाचे राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, आमदार राजू कारेमोरे यांच्यासह विविध लोकप्रतिनिधींनी केली होती. या मागणीस अनुसरून शेतकरी नोंदणीची मुदत १५ जानेवारी २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे.

याबाबत अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या उपसचिव राजश्री सारंग यांनी महाराष्ट्र राज्य कोऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन आणि महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळासह संबंधित एजन्सी यांना याबाबत कळवले आहे. ही मुदतवाढ अंतिम असून विहित मुदतीत शेतकऱ्यांनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन श्री. मुंडे यांनी केले आहे.

## श्रीवर्धन वनपरिक्षेत्रात मृत बिबट्या वनविभागाची कारवाई

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

वनपरिक्षेत्र श्रीवर्धन अंतर्गत बोर्ली पंचतन नियतक्षेत्राच्या आसुफ येथील मौजे बोर्ली येथील ओढ्यालगत शेताच्या बांधावर फासक्या मध्ये अडकलेला बिबट्या मृत अवस्थेत आढळला. या प्रकरणात वनपाल बोर्ली पंचतन यांनी ३० डिसेंबर २०२४ रोजी गुन्हा नोंदविला आहे.

वनपाल बोर्ली पंचतन यांना २९ डिसेंबर २०२४ रोजी याबाबत फोनद्वारे माहिती मिळाली होती. त्यानंतर सहाय्यक वनरक्षक, पशुधन विकास अधिकारी आणि श्रीवर्धन गावातील पंच व रेंज स्टाफ तातडीने घटनास्थळी दाखल झाले.तेथे पाहणी केल्यानंतर बिबट्या मृत असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर मृत बिबट्याला फासक्यातून सोडवून पशुवैद्यकीय अधिकारी श्रीवर्धन यांच्या कडून बाह्य तपासणी आणि शवविच्छेदन करण्यात आले. शवविच्छेदनानंतर मृत बिबट्याला पंचाच्या समक्ष जळित करण्यात आले. मृत बिबट्या नर होता आणि त्याचे वय अंदाजे ५ ते ६ वर्षे सांगितले जाते.

या प्रकरणात वनपाल बोर्ली पंचतन यांनी गुन्हा नोंदविला असून, पुढील तपास सुरू आहे. वनविभागाने मृत बिबट्याच्या संबंधित प्रकरणी अधिक चौकशी सुरू आहे.



## मुंबई-गोवा महामार्गाचे काम वर्षात मार्गी लावणार -खासदार तटकरे

**माणगाव : प्रतिनिधी**

गेली १७ वर्षे रखडलेल्या अवस्थेत असलेला, अपघातात हजारो जणांचे बळी घेणारा, मृत्यूचा सापळा बनलेला, असंख्य कुटुंब उध्वस्त करणारा बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित मुंबई गोवा महामार्गाचे काम माझी सर्व राजकीय ताकद वापरून येत्या नवीन वर्षातच पुर्ण करणार असे खा. सुनिल तट्करे यांनी माणगाव येथे मंगळवार( दि.३१ ) डिसेंबर रोजी घेतलेल्या आढावा बैठकीत सांगितल्याने माणगावकरांनी समाधान व्यक्त केले आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्या सहकार्याने कोकणातील सागरी मार्ग आणि ग्रीन फिल्ड एक्सप्रेस महामार्ग सुरू करण्याचे ध्येय ठेवले असून लवकरच या दोन्ही महामार्गाचे सुरू होईल. कोकणातील पर्यटन, रोजगार, उद्योग, शेती, बागायती, फळफळावळ यांना चालना देण्यासाठी हे मार्ग भविष्यात कोकणात नवीन क्रांती घडवून आणणारे आहेत. भविष्यात मुंबई गोवा महामार्गावर वाहतुकीचा ताण येवू नये आणि वाहतूक सुरळीत राहण्यासाठी हे दोन महामार्ग अत्यंत आवश्यक आहेत. हा महामार्ग लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी सर्वो तोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे हा महामार्ग तातडीने पूर्ण केला जाईल असे आश्वासन खासदार सुनील तटकरे यांनी दिले.

माणगाव आणि इंदापूर येथील वाहतूकीची कोंडी सोडविण्यासाठी खरवली जोड रस्ता ते मोरबा अशी वाहतूक मुंबई कडून श्रीवर्धन कडे जाणाऱ्या आणि येणाऱ्या वाहनांसाठी करण्यात येईल. तसेच मोरबा रोड कालवा मार्गे ते मुंबई गोवा महामार्ग अशी वाहतूक माणगाव शहरात न वळवता सुरू करण्यात येईल. तसेच पुणे येथून कोकणात येणाऱ्या पर्यटकांसाठी लवकरच भादाव येथील काळ नदीवरील पूल बांधण्यात येईल. तसेच माणगाव शहरातील वाहतुकीची कोंडीतून सुटका करून घेण्यासाठी काळ नदी आणि गोद नदीवरील पूलांची कामे दोन महिन्यांत पूर्ण करण्यात येतील. जे ठेकेदार हे काम वेळेत पूर्ण करणार नाहीत त्यांना शासनाच्या काळ्या यादीत टाकून त्यांच्यावर थेट गुन्हे दाखल करा असे स्पष्ट आदेश खासदार सुनील तटकरे यांनी उपस्थित रायगड जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना दिले.

माणगाव शहरातील पोलिस ठाणे, पोलिसांची निवासस्थाने, सैनिक विश्राम गृह, जिल्हा परिषद शाळा नगरपंचायतीमध्ये हस्तांतरीत करणे, तालुक्यातील जलजीवन पाणी पुरवठा योजना, रस्ते , एसटी बस, कालवा दुरुस्ती, नाट्यगृह प्रदुषण विरहीत कारखाने, शिवसृष्टी, रोजगार आदी विविध प्रकारच्या मागण्यांवर उपाययोजना करण्याचे आणि त्या मंजूर करण्याचे आश्वासन खासदार सुनील तटकरे यांनी दिले.

या सर्व मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठी दिल्ली, मुंबई येथे बैठका घेतल्या जातील. यासाठी ना. गडकरी ,मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री संबंधित मंत्री, अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा केला जाईल असे खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले.

## विद्यार्थ्यांनी भरवला आठवडा बाजार

**चौक : प्रतिनिधी**

विद्यार्थी यांच्या ज्ञानात आर्थिक व्यवहार याची भर पडण्यासाठी वाशिवली शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षक यांनी आठवडा बाजार भरवला होता. त्याचा फायदादेखील झाला.

खालापूर तालुक्यातील विमल पारनेकर सेमी इंग्लिश प्राथमिक विद्यामंदिर वाशिवली यांच्या विद्यार्थ्यांनी शिक्षक यांच्या सहकार्याने शाळेच्या मैदानावर आठवडा बाजार भरविला भरविला होता.यावेळी रसायनी परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन बाजारात मोठ्या प्रमाणावर खरेदी केली आणि मुलांना प्रोत्साहन दिले. बाजारामध्ये मुलांनी विविध प्रकारांच्या वस्तूंची दुकाने मांडली होती. याचे उद्घाटन सौ.विमलताई पारनेकर सेमी इंग्लिश प्राथमिक विद्यामंदिर वाशीवली या संस्थेचे अध्यक्ष तुळशीदास पाटील,



हायस्कूल प्राचार्य सोनवणे, शाळेच्या मुख्याध्यापिका रणदिवे यांच्या हस्ते करण्यात आले. मुलांना आर्थिक व्यवहार समजावेत,शिक्षण आणि व्यवहार यांची सांगड घालावी, कोणतेही काम कमी दर्जाचे नसते हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून आठवडा बाजार भरवला होता, असे मुख्याध्यापक यांनी सांगितले. यामध्ये मुलांनी विविध खाद्यपदार्थ, भाजीपाला, फळभाज्या, पुस्तके विक्रीसाठी ठेवली होती. आठवडी बाजार खरेदीसाठी परिसरातील नागरिकांनी गर्दी केली होती.

या वेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

## आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी लोकसेवक

रामेश्वर नाईक यांनी पुढे बोलताना सांगितले की, आरोग्याच्या दृष्टिकोनातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार जागरूक आहे. पंचतारांकित अशा रुग्णालयातसुद्धा गोर गरिबांसाठी काही जागा आरक्षित करण्यात आले आहे. महात्मा फुले जीवनदायी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व इतर योजनांच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मदत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जात आहे. संपूर्ण मोफत किंवा अत्यल्प दरात उपचार देण्याचा उद्देश आहे. असे सांगतानाच या ठिकाणी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी खूप चांगले काम केले असून पनवेलमध्ये उभारलेले हे वैद्यकीय सहाय्यता कक्ष महत्त्वपूर्ण ठरणार आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले. त्याचबरोबर मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचे पोर्टल या कार्यालयासाठी उपलब्ध करून देणार असल्याची ग्वाहीही त्यांनी या वेळी दिली.

## महाराष्ट्राचे पहिले एआय धोरण तयार करा -ना. आशिष शेलार

**मुंबई : प्रतिनिधी**

आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाच्या जागतिक स्पर्धेत महाराष्ट्राने दिशादर्शक व्हावे यासाठी राज्याचे पहिले एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) धोरण तयार करा, असे निर्देश माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड आशिष शेलार यांनी बुधवारी (दि.१) विभागाला दिले. एआय तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक उद्योग, व्यवसाय उभे राहतील. तरुणांना रोजगार मिळतील व तंत्रज्ञानाच्या जागतिक स्पर्धेत महाराष्ट्र सक्षमपणे स्पर्धा करू शकेल, असे त्यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृहावर बुधवारी माहिती व तंत्रज्ञान विभागाचा मंत्री ॲड आशिष शेलार यांनी आढावा घेतला. या बैठकीस आयटी विभागाचे सचिव पराग जैन नैनुटिया, महाआयटीच्या व्यवस्थापकीय संचालक जयश्री भोज आणि संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना मंत्री ॲड आशिष शेलार म्हणाले, एआय तंत्रज्ञानाचा युग सुरु झाले आहे. महाराष्ट्राने या क्षेत्रात आघाडी घेतली पाहिजे. एआयचा प्रभावी उपयोग करून आपण अधिक उद्योग व व्यवसाय आकर्षित करीत तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊ शकतो. जागतिक स्पर्धेत महाराष्ट्राचे स्थान भक्कम करण्याची ही संधी आहे.

मार्च २०२४ मध्ये सुरू करण्यात आलेल्या 'इंडिया एआय मिशन' अंतर्गत देशभरात एआय क्षमता वाढवण्यासाठी १०,३७२ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यात इंडिया एआय डेटासेट्स प्लॅटफॉर्म, ॲप्लिकेशन डेव्हलपमेंट प्रकल्प, ग्राफिक प्रोसेसिंग युनिट्स, इंडिया एआय इनोव्हेशन सेंटर, फ्युचर स्किल्स प्रोग्राम आणि एआय क्षेत्रातील स्टार्टअप्ससाठी वित्तपुरवठा यांचा समावेश आहे.

केंद्र सरकार जानेवारी २०२५ पासून वैयक्तिक नसलेल्या डेटासेट्सचे संकलन सुरु करणार आहे. यामुळे स्टार्टअप्स, कंपन्या, शैक्षणिक संस्था आणि संशोधका ॲप्स विकसित करण्यासाठी, विविध भाषांची सेवा देण्यासाठी तसेच आणि विशेष सेवा देण्यासाठी उपयोग होणार आहे. आपला देश तंत्रज्ञानाच्या आघाडीवर प्रगती करत असताना महाराष्ट्र यात अग्रेसर राहिला पाहिजे असे सांगितले.

## भाजप नेते सुधीर ठोंबरे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील दानशूर नेते, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे यांच्या वाढदिवसानिमित्ताने अनेक सामाजिक उपक्रम बुधवारी राबविण्यात आले. ८० टक्के समाजकारण २०% राजकारण यामुळे सुधीरशेठ चौक, रसायनी परिसरात गरिबांचे कैवारी म्हणून ओळखले जातात.

सुधीर ठोंबरे यांच्या वाढदिवसानिमित्ताने भक्ती वेदांत गोआश्रम चॅरीटेबल ट्रस्ट नानीवली (चौक) येथे जाऊन गो मातेच पूजन करून त्यांना खाद्य दिले. गो आश्रममधील लहान मुलांसोबत वाढदिवस साजरा केला. त्याचबरोबर चौक विभागातील नानिवली जिल्हा परीषद शाळा व वणखलवाडी येथे विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

या वेळी स्मिता सुधीर ठोंबरे, जान्हवी ठोंबरे, दिपक ठाकूर, यशवंत बिराजदार, शांताराम तवले, योगेश थळे, चंद्रकांत पवार, विजय देशमुख, बाळू भालसिंग शिक्षक, खुर्शीद आदी उपस्थित होते.






**नेरळ : मोतीराम बारकू देशमुख यांचा ७८वा वाढदिवस साजरा करण्यात आला. या वेळी नेरळ, माणगाव येथील देशमुख परिवाराकडून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.**

# पनवेल मनपाचा प्रदूषण नियंत्रणावर भर

## नियमांचे पालन न करणाऱ्या बांधकाम विकासकांना नोटिसा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिवाळ्यामध्ये एमएमआर भागातील हवेची गुणवत्ता खालवली जात असल्याचे दिसून आले आहे. अशा प्रदूषण करणाऱ्यांवर पनवेल महापालिकेने विशेष लक्ष केंद्रित केले असून प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर पालिकेने ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार आतापर्यंत प्रदूषणास कारणीभूत ठरत असलेल्या सुमारे १६४ बांधकाम विकासकांना नोटीसा देण्यात आल्या आहेत. तसेच बेकरी आणि हॉटेल्स, रेस्टॉरंट यांना महापालिकेच्या वतीने नोटीसा देणेकामी आदेश पारित करण्यात आले आहे.



पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात वाढते प्रदूषण रोखण्यासाठी महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी कठोर निर्णय घेतले आहेत. मा. उच्च न्यायालय यांनी दिलेले निर्देशानूसार निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी विकासकांनी करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत. वायु गुणवत्ता सुधारण्यासाठी संबंधित आस्थापनांनी १५ दिवसांत सुधारणा न केल्यास आस्थापना बंद करण्याची कारवाई करण्याबाबत स्पष्ट आदेश आयुक्तांनी दिले. मुंबई महापालिकेप्रमाणे पनवेल महापालिका क्षत्रातील बांधकामे थांबविण्यात येणार असल्याच्या कडक सूचना विकासकांना दिल्या आहेत.

हिवाळ्यात वाऱ्याचा कमी वेग आणि कमी तापमान यामुळे नैसर्गिक वायुवीजन कमी होते. त्यासमवेतच थंडीच्या कालावधीत कोरडे वारे आणि ढगाळ हवामान या कारणांमुळे वायु प्रदूषणात वाढ होते. वातावरणातील बदलांमुळे मुंबई महानगर प्रदेशातील हवेच्या गुणवत्तेवर विपरित परिणाम होत आहे. याचा परिणाम म्हणून हवेतील प्रदूषणात वाढ होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

१९ सप्टेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुख्यालयात घेण्यात आलेल्या बैठकीत राज्यातील सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये बेकरी व तंदूर करीता पारंपरीक इंधनाऐवजी स्वच्छ इंधन (उदा. LPG/विद्युत) वापरण्यासाठी योजना सादर करण्याचे निर्देश सह संचालक (हवा प्रदुषण नियंत्रण) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी दिले आहेत.

मा. उच्च न्यायालय यांनी दिलेले निर्देशानूसार निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांची आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभावाने अंमलबजावणी करण्यात येत आहे. महापालिका प्रभागक्षेत्रामध्ये सुरु असलेली बांधकामे व विकासकामांच्या ठिकाणी मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी संबंधित बिल्डर किंवा विकासक यांच्याद्वारे केली जात आहे की नाही याची प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर करण्यासाठी महापालिकेमध्ये हवा प्रदूषण नियंत्रण समिती गठित करण्यात आली आहे. यामध्ये प्रभाग अधिकारी, उप अभियंता, सहाय्यक नगररचनाकार, मुख्य आरोग्य निरीक्षक काम पहाणार आहेत. याचपध्दतीने प्रभाग समिती स्तरीय हवा प्रदूषण नियंत्रण भरारी पथके गठीत करण्यात आली आहेत. ही हवा प्रदूषण नियंत्रण समिती भरारी पथकांवरती लक्ष ठेवणार आहे. प्रभाग समिती स्तरावरून प्राप्त होणारे अहवाल व प्रत्यक्ष पाहणी तपासून हवा प्रदूषण नियंत्रणासाठी ही समिती आवश्यक उपाय योजना करणार आहे.

या प्रभाग समिती स्तरीय हवा प्रदूषण नियंत्रण भरारी पथकामध्ये प्रभाग अधिक्षक, पथक प्रमुख, मुख्य आरोग्य निरिक्षक, प्रभाग अभियंता, स्वच्छता निरिक्षक यांची निवड करण्यात आली आहे. या भरारी पथकाच्या माध्यमातून प्रभाग समिती स्तरीय हवा प्रदूषण नियंत्रण पथकाने चालू बांधकाम,विकासकामांना भेट देवून प्रत्यक्ष तपासणी अहवाल पर्यावरण विभागास सादर करावा, असे निर्देश आयुक्त मंगेश चितळे यांनी दिली आहे.

### प्रभाग निहाय नोटीस दिलेल्या विकसकांची संख्या पुढीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. प्रभाग समिती अ खारघर | : | १९ |
| २. प्रभाग समिती ब कळंबोली | : | २७ |
| ३ .प्रभाग समिती क कामोठे | : | ४४ |
| ४. प्रभाग समिती ड पनवेल | : | ०१ |
| ५. नावडे उपविभाग | : | ७३ |
| एकुण संख्या | : | १६४ |

# फूटपाथवर अतिक्रमण करणाऱ्यांवर तोडक कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात अनधिकृतपणे फूटपाथवर अतिक्रमण करणाऱ्या फेरीवाल्यांवर, दुकानदारांवर, व्यवसायिकांवर बुधवारी (दि.१) आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेप्रमाणे प्रभाग समिती ब कळंबोली प्रभाग क्र १० मध्ये अतिक्रमण कारवाई करून 'फुटपाथ स्वच्छ मोहिम' राबविण्यात आली.

प्रभाग समिती ब कळंबोलीचे सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार यांच्याआदेशानुसार प्रभाग समिती ब कळंबोली प्रभाग क्र १० मध्ये फुटपाथवरील सर्व आतिक्रमणे काढण्यात आली. यावेळी आतिक्रमण विभाग व मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, मुख्य स्वच्छता निरीक्षक योगेश कस्तुरे, स्वच्छता निरीक्षक दिग्नेश भोईर, अमोल कांबळे व अमित जाधव तसेच आतिक्रमणचे व स्वच्छतेचे कर्मचारी उपस्थित होते. यावेळी फूटपाथवरील दुकानांच्या नावांचे बॅनर्स, अनधिकृत वाढविलेले शेड, दुकानांतील सामान, टायर्स इतर सामान यावर कारवाई करून सामान जप्त करण्यात आले.

महापालिका कार्यक्षेत्रात रस्त्यांवर, फूटपाथवर अतिक्रमण करणाऱ्या फेरीवाल्यांवर, व्यावसायिकांवर, खाद्य व्यवसायिकांवर तसेच अनधिकृत बॅनरर्सवरती आयुक्त मंगेश चितळे यांनी तोडक कारवाई तीव्र करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानूसार गेल्या महिन्याभरापासून चारही प्रभागांमध्ये अतिक्रमण विरोधात जोरदार कारवाई करण्यात येत आहे.





**पनवेल : भाजप नेते गणेश गायकवाड यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.**

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते दिनदर्शिका २०२५चे प्रकाशन

**पनवेल : वार्ताहर**

सालाबादप्रमाणे यावर्षीदेखील पनवेल महापालिकेचे माजी सभापती तथा माजी नगरसेवक मनोहर जानू म्हात्रे यांनी प्रकाशित केलेल्या दिनदर्शिका २०२५ चे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्व नागरिकांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, मोतीलाल कोळी, प्रवीण पाटील, राज पाटील, राहुल कांबळे, मंगेश ठाकूर आदी उपस्थित होते.





**पनवेल : जिल्हा नियोजन निधी अंतर्गत गव्हाण येथे जलवाहतुकीसाठी प्रवासी शेड बांधण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी जयवंत देशमुख, उषा देशमुख, सुहास भगत, के.डी. कोळी, हेमंत ठाकूर आदी उपस्थित होते. दरम्यान, या कामाला नऊ लाख ९९ हजार ९९९ खर्च येणार आहे.**



**पनवेल : नवीन वर्षानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जयवंत देशमुख, किशोर पाटील, हेमंत ठाकूर, सुदर्शन घरत, अमित कडू आदी उपस्थित होते.**

**पनवेल : वहाळचे माजी उपसरपंच तथा भाजप उलवे नोड विभागीय अध्यक्ष अमर म्हात्रे यांनी नवीन वर्षानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना शुभेच्छा दिल्या. दरम्यान, अमर म्हात्रे व त्यांच्या पत्नी सुनंदा म्हात्रे यांना लग्नाच्या वाढदिवसानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी ॲड. सुनील कुमार मौर्य, मदन पाटील, अवधेश महतो, संकल्प घरत, संतोष तुडमे, अमित नाईक, विलास चंदेल, उदय पांडे, देवालय मित्रा, मयुरेश म्हात्रे, सुनील कुमार मौर्य, अर्चना चौहान, सुनंदा म्हात्रे, प्रल्हाद सगर, राजरत्न पिल्लयी, शेखर नदार, अजय हेगटकर, गोपी भोईर, प्रीतम घरत आदी उपस्थित होते.**



# गव्हाण विद्यालयास शालेय पोषण आहारच्या जिल्हा अधिक्षकांची भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या शालेय पोषण आहार विभागाला रायगड जिल्हा शालेय पोषण आहार विभागाचे अधिक्षक नवनाथ साबळे यांनी बुधवारी (दि.१) अचानक भेट दिली.



या वेळी अधिक्षक साबळे यांनी प्रत्यक्ष भोजनाचा आस्वाद घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून त्यांच्याकडून माहिती घेतली. त्याचप्रमाणे पोषण आहार कक्षाला भेट देवून उपलब्ध धान्यसाठा व अन्य साहित्याची साठवणूक, वापराच्या अंतिम तारखा इत्यादी बाबींची पाहणी करुन प्रत्यक्ष विद्यार्थ्यांशी संपर्क साधला.तसेच शालेय परिसरातील परसबागेलाही त्यांनी भेट दिली. विद्यालयाचा परिसर, परसबाग इत्यादींना भेट देऊन पोषण आहार विभागाच्या दस्ताऐवजांची तपासणी केली आणि काही महत्त्वपूर्ण सूचना केल्या. या वेळी नवनाथ साबळे यांनी विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या मध्यान्ह भोजनाची चवही चाखली.

या भेटी दरम्यान विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे, विद्यालयाच्या शालेय पोषण आहार विभागाचे प्रमुख एकनाथ ठाकूर, सहायक प्रशांत परदेशी, संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे व सागर रंधवे, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे, राजू खेडकर, ग्रंथपाल महेश म्हात्रे आदी उपस्थित होते.

# शिक्षकांच्या ड्रेस कोडचे अनावरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या संकल्पनेतून व अतिरिक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त प्रसेनजीत कारलेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका शिक्षण विभागातील शिक्षकांसाठी ड्रेस कोड ब्लेझर व ट्रॅक सुट तयार करण्यात आला आहे. बुधवारी (दि.१) या ड्रेस कोडचे अनावरण शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी शिक्षक संघटनेच्या राज्य उपाध्यक्षा ज्योत्सना भरडा, राज्य सल्लागार प्रमोदजी लांगी, कोकण विभागिय अध्यक्ष वैभव पाटील, केंद्र समन्वयक अशफाक काझी व सर्व मुख्याध्यापक वर्ग उपस्थित होता.

गुणवत्तापूर्ण उपक्रम राबवून पालिकेतिल विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे काम सर्व शिक्षक वृंदाकडून होवो, अशा शुभेच्छा पनवेल महानगरपालिका शिक्षणाधिकारी यांनी यावेळी दिल्या. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षिका ज्योत्सना भरडा यांनी पुढाकार घेऊन महत्वपूर्ण भूमिका बजावली.

# 'सीकेटी'च्या सहाय्यक शिक्षक प्रदीप देशमुखांचा सेवापूर्ती सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील सहाय्यक शिक्षक प्रदीप देशमुख यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा डिसेंबर रोजी विद्यालयात झाला. या सत्कार समारंभासाठी संस्थेचे संचालक मंडळ सदस्य वसंतशेठ पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते प्रदीप देशमुख यांचा सपत्नीक यथोचित सत्कार सन्मान करण्यात आला.



सेवापुर्ती सोहळ्यात उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, सहशिक्षक शशिकांत भोसले या सर्वांनी प्रदीप देशमुख यांच्याविषयी आपले मनोगत व्यक्त करून त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षिका वैशाली पारधी यांनी प्राथमिक विभागातर्फे तसेच उच्च माध्यमिक विभागाच्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांतर्फे देशमुख सरांचा पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन सन्मान केला. तसेच या सोहळ्यासाठी मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, सहशिक्षक राजेंद्र गांगरे यांच्यासह शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रदीप देशमुख यांनी आपले विचार व्यक्त करताना आपल्या मागील आठवणींना उजाळा दिला.

## संपादकीय

# बदलांच्या उंबरठ्यावर जग

एकविसाव्या शतकातील हे २५वे वर्ष असल्यामुळे २०२५ ला जागतिक स्तरावर विशेष महत्त्व दिले जात आहे. शंभर वर्षांपूर्वी विसाव्या शतकात १९२५ पासून जागतिक स्तरावर अनेक महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या होत्या, त्याचीही आठवण जागवली जात आहे. आजही जग तशाच मोठ्या बदलांच्या उंबरठ्यावर उभे आहे. याकडे सामाजिक-ऐतिहासिक विश्लेषक लक्ष वेधत आहेत.

**मावळत्या वर्षाला अलविदा म्हणत अवघ्या जगाने उत्साहाने नवीन वर्षाचे, २०२५चे स्वागत केले आहे. जगभरात सगळीकडेच यासाठी मित्रपरिवार, कुटुंबियांसह मौजमजा करण्यासाठी पर्यटकांनी गर्दी केल्याचे दिसून आले. भारतीयांनी आपापल्या श्रद्धेनुसार धार्मिक स्थळीही गर्दी केली व ईश्वरचरणी माथा टेकत नव्या वर्षाची सुरुवात केली. आगामी काळाकडे मोठ्या बदलांना घेऊन येणारा कालखंड म्हणून पाहिले जात आहे. आज आपण एआयच्या वापराबद्दल धास्तावलेलो आहोत तसेच शंभर वर्षांपूर्वी जग वाफेवर चालणारी जहाजे, रेल्वेगाड्या, वीजेचा वापर आणि दूरसंचाराच्या शोधाने गोंधळून गेले होते. तेव्हाही कामगारांना यंत्रे आपल्याला विस्थापित करतील अशी भीती वाटलीच होती, परंतु वर उल्लेखिलेल्या सगळ्या ऐतिहासिक बदलांना व दोन महायुद्धांना मानवजात पुरून उरली. जगभरात आजच्या घडीला अनेक देशांमधील लोकशाही व्यवस्थांसमोर आव्हानात्मक परिस्थिती आहे. रशिया-युक्रेन यांच्यातील युद्ध तिसऱ्या वर्षीही थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. उलट इस्रायल-हमास यांच्यातील सशस्त्र संघर्षाचा परीघ अधिक व्यापक झाला आहे. आणि अवघ्या जगासमोर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) म्हणजेच एआयच्या वापरातून नेमके काय काय स्वरूपाचे बदल आपल्या जगण्यात घडून येतील याविषयी साशंकता आहे. सुमारे शंभर वर्षांपूर्वी भारतातही स्वातंत्र्यलढा आकार घेऊ लागला होता. त्यानंतरच्या काळात देश कुठल्या कुठल्या आणि किती मोठ्या बदलांतून गेला हा सगळा इतिहास सगळ्यांना ज्ञात आहेच. आज तशाच मोठ्या बदलांच्या उंबरठ्यांवर जग आणि आपणही उभे आहोत इतकेच. अमेरिकेसारख्या आजही जगातील सगळ्या बलाढ्य महासत्ता गणल्या जाणाऱ्या देशात अध्यक्षपदाच्या निवडणुकीत बाजी मारलेले डोनाल्ड ट्रम्प २० जानेवारी रोजी पदभार स्वीकारतील. ट्रम्प यांच्या स्थलांतरविषयक कडक भूमिकेमुळे त्यांच्या आगामी कार्यकाळाकडे भारतीयांचे विशेष लक्ष आहे. अर्थात त्यांच्या निकटवर्तीयांमध्ये अनेक भारतीयांचा समावेश असल्याने व्हिसाविषयक सुधारणांचीही अपेक्षा आहे. अमेरिका आणि भारत यांच्यातील संबंध सध्या अतिशय उत्तम असून इस्त्रो आणि नासा यांच्यातील सहकार्याचे मोठे दर्शन आगामी काळात घडेल. येत्या मार्च ते जून दरम्यान नासाच्या मदतीने भारतीय अवकाशवीर शुभांशू शुक्ला आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर दाखल होणार आहे. इकडे राष्ट्रीय पातळीवर यंदाचे वर्ष हे कुंभमेळ्याचे वर्ष असल्याने महत्त्वाचे आहे. दर १२ वर्षांनी भरणारा कुंभमेळा यंदा १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी दरम्यान उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे पार पडणार आहे. देशातील राजकीयदृष्ट्या मोठी घडामोड म्हणून 'एक देश, एक निवडणूक' या विधेयकाचा उल्लेख करावा लागेल. १२९वी घटनादुरुस्ती करणारे हे विधेयक यंदा राजकीय चर्चेत अग्रस्थानी आहे. दिल्ली आणि बिहार या राज्यांच्या निवडणुकांकडे यावर्षी देशाचे लक्ष असेल तर, महाराष्ट्रात यंदाचे वर्ष हे निवडणुकांचेच वर्ष असेल. मुंबई महापालिकेसोबतच राज्यभरातील तब्बल २९ महापालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुका यावर्षी होणार आहेत. अर्थात नवी उमेद मनात घेऊनच आपण या साऱ्या घडामोडींना सामोरे जाणार आहोत.**

# खैर तस्करीचे नवे तंत्र; गुजरातपर्यंत धागे दोरे







**खबरबात**
**शैलेश पालकर**

सरत्या वर्षाला २०२४ ला निरोप देताना पोलादपूर शहरातील वनखात्याच्या तपासणी नाक्यावर अक्षरश: धूळफेक करण्यात यशस्वी झालेल्या खैरमाफियांना चुकून अडवून तपासणी करणाऱ्या वाहतूक पोलीसांना खैरापासून तयार केलेल्या काताचा अर्क असलेल्या २४० पिंपांचा सुगावा लागल्याची घटना खैरतस्करीचे नवे तंत्र अस्तित्वात आल्याची धोक्याची घंटा वाजवित आहे.

आतापर्यंत खैराची लाकडे अन्य लाकडांमधून वाहतूक करून नेण्याचे तंत्र आत्मसात असलेल्या खैर तस्करांनी गावोगांव खैर सोलीव ओंडके जमा करणारे एजन्ट नेमण्याचे सत्रही अवलंबिले होते. एका ट्रकमध्ये साधारणपणे ५-७ लाखांचा माल घेऊन जाताना ट्रक पकडल्यास खैर आणि ट्रक दोन्हीही पकडले जाऊन या तस्कराचे सुमारे १५ लाखांचे नुकसान होत असे, मात्र खैरापासून तयार केलेल्या काताचा अर्क तयार करून त्याची लिलया वाहतूक करताना केमिकल वाहतुकीच्या ड्रम्सचा वापर करण्याचा प्रकार हा खैरतस्करांचा नवा फंडा कधीपासून कार्यरत आहे, त्यावरून आतापर्यंत मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरून किती पिंपं वाहतूक करून गुजरातमुक्कामी पोहोचले, याचा अंदाज लावता येत आहे.

गेल्या काही वर्षांपासून गुजरात राज्याच्या जीएसटीसी गुजरात स्टेट ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशनच्या बसमधून गुटखा व खैनीसदृश्य तयार मालाची वाहतूक होत असल्याचे काही धाडीमधून स्पष्ट झाले होते. पोलादपूर तालुक्यात शेवटचा थांबा असलेल्या गुजरात राज्याच्या बसचा मुक्काम पोलादपूर वनउपज तपासणी नाक्याजवळच्या ढाब्याजवळ असतो. पोलादपूर ते मुंबईपर्यंत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसची प्रवासी वाहतूक सुरू होत नसताना गुजरात राज्याची बस नियमितपणे वाहतूक करीत असल्याचे आश्चर्य कोणालाही वाटत नाही.

**२०२४ वर्षांतील पहिला खैर छापा**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील पोलादपूर येथील वनउपज तपासणी नाक्यावर एका ट्रकच्या झडतीमध्ये साधारणपणे १० हजार ४३३ रूपये किंमतीचे खैरतोडीच्या तुकडयांचे ७७ नग ट्रकसह जप्त करण्यात आल्याची माहिती डिएफओ रोहा अप्पासाहेब निकत यांच्यामार्फत देण्यात आली आहे.

वनउपज तपासणी नाका पोलादपूर येथे एसीएफ रोहा विश्वजित जाधव यांच्याकडील गुप्तमाहितीनुसार चिपळूणच्या दिशेने जाणारा ट्रक (एमएच ११ एएल २०५०)ची तपासणी वनविभागाच्या स्थानिक स्टाफमार्फत करण्यात आली असता त्या ट्रकमध्ये खैराचे १०हजार ४३३ रूपये किंमतीचे ७७ तुकडे आढळून आले. यावेळी सदरचा बिनपासी मुद्देमाल आढळून आल्याबद्दल ट्रकचालक विजय महादेव मांजरेकर रा.शिरगांव, ता.चिपळूण व इतर चार इसम यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई करून ट्रक क्रमांक- एमएच ११ एएल २०५० हा ६ लाख रूपयांचा मुद्देमालही खैराच्या तुकडयांसह जप्त करण्यात आला.

**२०२४ वर्षांतील दुसरा खैर छापा**

पोलादपूर तालुक्यातील खैरतस्करांवर वनविभागाने पुर्णपणे नियंत्रण मिळविले असताना पोलादपूर येथील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वनउपज तपासणी नाक्यावर चिपळूणच्या दिशेने जाणारा ट्रक ४३० खैराचे सोलीव तुकडे घेऊन जाताना जप्त करण्यात आला आहे.

बुधवार, दि. ३ जुलै २०२४ रोजी रोहा उपवनसंरक्षक आप्पासाहेब निकत, सहायक वनसंरक्षक रोहा विश्वजित जाधव, महाड परिक्षेत्र वनअधिकारी राकेश साहू यांच्या मार्गदर्शनाखाली वनउपज तपासणी नाका - पोलादपूर येथे मुंबई गोवा महामार्गावरून चिपळूणच्या दिशेने जाणारा ट्रक (क्र.जीजे१७ युयु ९८३७) ची तपासणी पोलादपूरच्या स्थानिक वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी केली असता ट्रकमध्ये खैराचे अंदाजे ६८ हजार ५७२ रुपये किंमतीचे ४३० बिनपासी सोलिव तुकडे असा मुद्देमाल मिळाल्याने ट्रकचालक सिद्दिक अब्दूलरहीम वाढेल रा.गोधरा, ता. जिल्हा-गोधरा (राज्य गुजरात) व अन्य एक इसम यांच्याविरूध्द कारवाई करून ट्रकदेखील जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या ट्रकची किंमत अंदाजे सात लाख रूपये आहे.

**२०२४ वर्षांतील तिसरा खैर अर्कावर छापा**

जुलै २०२४नंतर पोलादपूर वनउपज तपासणी नाक्यावर तसेच महाडपर्यंत कोणताही खैर वाहतूक करणाऱ्या ट्रकवर छापा पडलेला नाही. यामागे खैर तस्करांनी बदललेले तंत्र असून साधारण खैर वृक्ष तोडीनंतर ३० टक्के काताच्या गाभ्याचा उतारा येत असतो व उर्वरित सोलीव लाकडे मिळतात अशी माहिती प्राप्त होत असताना खैरतोडीनंतर चार ट्रक गाभ्यापासून काताचा अर्क बनविल्यास केवळ एका ट्रकात राहतील एवढी २४० पिंपं तयार होतात, असे निदर्शनास आले आहे. म्हणजेच एका ट्रकमधील माल हा अर्धा तयार माल असून या खैर कात अर्काची प्रक्रिया करून वाहतुकीसाठी गुजरातमधील गुटखा आणि खैनी तस्करांनी कोकणात मोठयाप्रमाणात आर्थिक गुंतवणूक केल्याची चर्चा आहे.

कोकणातील एजन्ट खैराचे झाड तोडून सोलीव गाभ्याचा भाग या कारखान्यांपर्यंत पोहचवितात आणि तेथून रेल्वे आणि ट्रकद्वारे वाहतूक करण्यापूर्वी काताचा अर्क तयार करून पिंपांमधून भरण्याचे तंत्र अस्तित्वात आले आहे. महामार्गावरून मालवाहतूक करणाऱ्या अथवा रोरो सेवेद्वारे जाणाऱ्या ट्रकचा या व्यवसायामध्ये वापर केला जात असतो. ही बाब उघडकीस आली असली तरी यामध्ये पोलीसांना माहिती देणाऱ्या खबरींची यंत्रणा आहे; तशीच वनविभागाला गाफिल करणारी यंत्रणाही असण्याची शक्यता दिसून येत असल्याने खैरतस्करांच्या या खैर काताच्या अर्काची वाहतूक करण्याच्या नव्या शक्कलीमुळे पोलादपूर व महाड येथील वनविभागाच्या डोळ्यांत धूळफेक करून ट्रक राजापूर येथून गुजरातकडे रवाना होणार असल्याची माहिती प्राप्त झाली असली तरी या सर्वप्रकारात पोलीस आणि वनविभागाने समन्वयाने केलेल्या कारवाईचे यश पाहता यापूर्वी अनेक ट्रक्समधून ड्रमद्वारे खैर कात अर्काची वाहतूक करण्यात खैरतस्कर यशस्वी झाले असल्याची शक्यता व्यक्त होत आहे.



## बदलते तंत्रज्ञान



### एअरटेलचे वर्षभराचे तीन प्लॅन्स; महिन्याला रिचार्जचे टेन्शन दूर!

जिओ, एअरटेल, व्हीआय यांची देशातील प्रमुख टेलिकॉम कंपन्यांमध्ये गणना होते. त्यांच्यापैकी एअरटेल ही कंपनी विविध प्रकारचे रिचार्ज प्लॅन सादर करते. या रिचार्ज प्लॅनमध्ये अगदी एक दिवस, एक महिना ते एक वर्षापर्यंतच्या प्लॅनचाही समावेश असतो, पण सतत रिचार्ज करण्याचा कंटाळा येत असेल, तर तुमच्यासाठी ही आनंदाची बातमी आहे. तुम्हाला एअरटेलच्या तीन स्टॅण्डआउट रिचार्ज प्लॅन्सबद्दलची माहिती देणार आहोत, ज्यामुळे तुम्हाला वर्षभर रिचार्ज करण्याचे टेन्शन राहणार नाही.

**१९९९ रुपयांचा प्लॅन**

एअरटेलचा १९९९ रुपयांचा प्लॅन ग्राहकांना ३६५ दिवसांची वैधता देते, ज्यामुळे तुम्हाला वर्षातून फक्त एकदाच पेमेंट करावे लागेल. हा प्लॅन तुम्हाला महिन्याला केवळ १६७ रुपयांना पडेल. हा प्लॅन केल्यानंतर तुम्ही वर्षभर सर्व नेटवर्कवर अमर्यादित कॉलिंग, २४ जीबी डेटासह म्हणजेच तुम्ही दरमहा २ जीबीपर्यंत हाय-स्पीड डेटा वापरू शकता. याव्यतिरिक्त प्लॅनमध्ये दररोज १०० मोफत एसएमएससुद्धा दिले जातील. त्याचप्रमाणे हा प्लॅन Airtel Xstream, हॅलो ट्युनमध्ये विनामूल्य प्रवेश करण्याची संधी देईल.

**३,५९९ रुपयांचा प्लॅन**

तुम्हाला वर्षातून एकदाच रिचार्ज करण्याचा प्लॅन निवडायचा असेल, तर एअरटेलचा ३,५९९ रुपयांचा प्लॅन तुमच्यासाठी बेस्ट ठरेल. ३६५ दिवसांची वैधता, अमर्यादित कॉलिंग, २ जीबी डेटा, दररोज १०० फ्री एसएमएस ही प्लॅनची वैशिष्ट्ये आहेत. या रिचार्जची मासिक किंमत अंदाजे ३०० रुपये आहे.

**३,९९९ रुपयांचा प्लॅन**

वर्षभराचा रिचार्ज, अतिरिक्त डेटा आणि मनोरंजनसुद्धा पाहिजे असेल, तर त्यासाठी तुम्हाला वर्षातून फक्त एकदाच पेमेंट करावे लागेल. या प्लॅनमध्ये तुम्हाला ३६५ दिवसांसाठी अमर्यादित कॉलिंग, दैनंदिन २.५ जीबी डेटा, ग्राहकांना बक्षीस म्हणून ५ जीबी अतिरिक्त डेटाचा बोनस मिळेल. या प्लॅनमध्ये डिस्ने प्लस हॉटस्टार मोबाईलचे एक वर्षाचे सबस्क्रिप्शनसुद्धा दिले जाईल.

# समाजसुधारक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे



**निमित्त**

कोणत्याही फळाची अपेक्षा न बाळगता काम करणारे थोर समाजसेवक म्हणजे विठ्ठल रामजी शिंदे. त्यांनी इंग्लंडला जावून त्या काळी उच्चशिक्षण घेतले. त्यानंतर भारतात परतल्यानंतर मोठमोठाले मान-सन्मान आणि नोकऱ्या नाकारून अस्पृश्यता निवारण आणि स्वातंत्र्यलढ्यात वाहून घेतले. शेतकरी चळवळीलाही बळ दिले. या थोर समाजसेवकाचा आज २ जानेवारी रोजी स्मृतिदिन. त्यांच्या अफाट कार्याची ही ओळख.

विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म २३ एप्रिल १८७३ रोजी कर्नाटकातील जमखंडी येथे त्यांचा जन्म झाला. त्यांनी प्रारंभी जमखंडी येथे शिक्षकाची नोकरी केली. पुढे वकिलीचे शिक्षण पूर्ण केले. उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. त्यासाठी त्यांना प्रार्थना समाजाने मदत केली. भारतात परतल्यानंतर त्यांनी मिळणारे सारे मान सन्मान, उच्च अधिकाराच्या जागा नाकारल्या आणि स्वत:ला प्रार्थना समाजाच्या कार्याला वाहून घेतले. आपल्या समाजाला अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, कर्मकांड, रुढी आणि परंपररांच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी अवघे जीवन समर्पित केले.


विठ्ठल शिंदे यांनी स्वातंत्र्यलढात सहभाग घेतला. अस्पृश्यता निवारणाचे काम हाती घेतले. अस्पृश्य समजात शिक्षणाचा प्रसार घडवून आणणे, अस्पृश्यांना नोकरीची संधी मिळवून देणे, त्यांच्या अडचणी सोडवणे, त्यांना खऱ्या धर्माची शिक्षण देणे, त्यांच्या प्रगती आणि ज्ञानाची तहान निर्माण करणे यासाठी त्यांनी १८ ऑक्टोबर १९०६ रोजी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन'ची स्थापना केली. अस्पृश्य समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार करण, अस्पृश्य बांधवांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्या अडचणींचे निवारण करणे, अस्पृश्यांना खऱ्या धर्माची शिकवण देणे आणि त्यांचे शीलसंवर्धन घडून आणणे ही या मिशनची वैशिष्टे होती.

'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' संस्थेच्या माध्यमातून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अनेक उपक्रम हाती घेतले. त्यांमध्ये अस्पृश्य मुलांसाठी शाळा सुरू करणे, त्यांच्यासाठी वसतिगृहे उघडणे, शिवणकामाचे वर्ग चालवणे, प्रबोधनपर व्याख्याने कीर्तने आयोजित करणे, आजारी असणाऱ्या लोकांची सेवा करणे, इत्यादी गोष्टींचा समावेश या संस्थेच्या कार्यामध्ये होता. संस्थेच्या अकोला, अमरावती, इंदूर, कोल्हापूर, ठाणे, दापोली, पुणे, भावनगर, मद्रास, मालवण, मुंबई, सातारा, हुबळी, इत्यादी ठिकाणी उघडण्यात आल्या होत्या. सोबतच १९३३ मध्ये 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हा ग्रंथ लिहिला. त्याद्वारे या प्रश्नाकडे लोकांचे लक्ष वेधण्याचे काम केले.

विठ्ठल शिंदे एवढ्यावरच थांबले नाहीत. त्यांनी शेतकऱ्यांसाठी काम केले. त्यांना जागृत आणि संघटित करण्यासाठी त्या काळात शेतकरी परिषदांचे आयोजन केले. १९२० ते १९२६ या काळात त्यांनी शेतकरी चळवळ उभी केली. या थोर समाजसेवकाने २ जानेवारी १९४४ रोजी या जगाचा निरोप घेतला. **(साभार : इंटरनेट)**

**बातमीतील बात**



## आरोग्य प्रहर

### घाईघाईत सकाळचा नाश्ता टाळता? मग 'हे' समजून घ्या



सकाळचा नाश्ता करायचा किंवा नाही (नाश्ता टाळणे) याबद्दलचे वाद अनेक वर्षांपासून सुरूच आहे. त्यामध्ये नाश्ता करण्याची तुमची निवड, तुमची भूक, हार्मोनल संतुलन व तुमची आरोग्य उद्दिष्टे (मग तुम्हाला स्नायू तयार करायचे आहेत किंवा वजन कमी करायचे आहे) यावर अवलंबून असते. तर याबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी चेन्नई येथील श्री रामचंद्र इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अॅण्ड रिसर्च आणि क्लिनिकल न्यूट्रिशनिस्टच्या लेक्चरर सी.व्ही. ऐश्वर्या यांच्याशी चर्चा केली.

शरीराच्या ऊर्जेच्या गरजा आणि एकूणच चयापचय क्रिया निश्चित करण्यात भूक महत्त्वाची भूमिका बजावते. विशेषतः नाश्ता वगळण्याच्या परिणामाचा विचार करताना. आपली भूक घ्रेलिन व लेप्टिन यांसारख्या संप्रेरकांद्वारे नियंत्रित केली जाते आणि नाश्ता न केल्याने हे संतुलन बिघडते, ज्यामुळे दिवसभरात भूक लागते. मग जास्त खाणे किंवा अस्वास्थ्यकर अन्न निवडणे या गोष्टी आपल्याकडून नकळत होतात. रात्रभर आपण काहीच खात नाही. त्यामुळे उपवास सोडण्यासाठी नाश्ता आवश्यक आहे, ज्यामुळे चयापचय सुरू होतो, पण सकाळच्या भुकेकडे दुर्लक्ष केल्याने चयापचय प्रतिसादास विलंब होऊ शकतो. परिणामी कमी ऊर्जा खर्च होते आणि कालांतराने वजन वाढू शकते.

या गोष्टींचा चयापचय प्रक्रियांवर महत्त्वपूर्ण परिणाम होतो. त्यामुळे नाश्ता वगळण्यापूर्वी हार्मोनल आरोग्याचा विचार करणे महत्त्वाचे आहे. कॉर्टिसॉल, तणाव संप्रेरक, ऊर्जा एकत्रित करण्यात सकाळचा नाश्ता नैसर्गिकरीत्या मदत करू शकतो. त्यामुळे नाश्ता न केल्यास कॉर्टिसोलची पातळी वाढू शकते, ज्यामुळे पोटातील चरबीचा वाढणे, कालांतराने इन्सुलिनचा प्रतिकार होतो. याव्यतिरिक्त रात्रभर उपाशी राहण्याच्या कालावधीनंतर इन्सुलिनची संवेदनशीलता वाढवण्यात नाश्ता महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे जर तुम्ही नाश्ता केला नाहीत, तर ग्लुकोजचे नियमन विस्कळित होते; ज्यामुळे नंतरच्या जेवणानंतर रक्तातील साखरेची पातळी वाढते. कालांतराने यामुळे टाईप-२ मधुमेह व इतर चयापचय विकार होण्याचा धोका वाढू शकतो. नाश्ता करणे टाळण्यापूर्वी आरोग्याच्या उद्दिष्टांचा विचार करणे आवश्यक आहे, कारण ऊर्जा संतुलन, चयापचय व एकूणच शारीरिक कार्ये प्रभावित करण्यात नाश्ता महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो.

# श्री तिर्थक्षेत्र महादेव मंदिर परिसर विकसित करणार -खासदार तटकरे

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील श्री तिर्थक्षेत्र महादेव मंदिर व परीसर सुशोभीकरण करण्यासाठी पर्यटन व सांस्कृतिक कार्यविभाग अंतर्गत पहीला टप्पा २ कोटी २१ लाख खर्चून बांधण्यात येत आहे. या कामाचे भूमिपूजन खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.



आज या कामाचे भूमिपूजन होत असताना हे मंदिर या वर्षातच पूर्ण होईल. यासाठी लागणारा दुसऱ्या टप्प्याचे निधी सुद्धा याच आर्थिक वर्षात देण्यात येईल.या परीसराचा आराखडा तयार करा. भविष्यात हे तिर्थक्षेत्र अशा पद्धतीने विकसीत केले जाईल. जेणेकरून महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातुन भाविक या तीर्थक्षेत्राला भेट देण्यासाठी येतील. चांगले पायाभूत सुविधा येथे मिळतील असे खा. सुनील तटकरे यांनी सांगितले

आपल्या विभागातील लोकांनी आदितीला भरभरून मत रुपी दान दिले आहे. सगळ्यात चांगली योजना असलेल्या लाडकी बहीण योजना मध्ये आदितीने महत्वाचे काम केले आहे. शासन दरबारी आईचे नाव देण्याचा कायदेशीर मान्यता देण्याचे काम आदितीने केले.यासह अनेक या भागातील सार्वजनिक कामाची दखल घेत आदीतीला विधानसभा निवडणुकीत भरभरून मतदान झालधाटाव विभागातील नागरीकांनी महादेव मंदिरासाठी निधीची मागणी केल्यानंतर आदीती व अनिकेत यांनी पुढाकार घेतल्याने २ कोटी २१ लाख रुपयांचे निधीला मान्यता मिळाल्याचे त्यांनी सान्गितले

यावेळी राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, जिल्हा उपाध्यक्ष शंकरराव भगत, तालुका अध्यक्ष विनोद पाशीलकर, भाजप तालुका अध्यक्ष अमित घाग, माजी उपसभापती अनिल भगत, सरपंच गणेश माने, उपसरपंच संतोष माने, हरिश्चंद्र माने, सुनील मोरे, दिनेश रटाटे, यशवंत रटाटे, हरीचंद्र मोरे, दत्ता चव्हाण, नामदेव म्हसकर, विठ्ठल मोरे, गुणाजी पोटफोडे, सी.बी. जोशी, रामाशेठ म्हात्रे, नरेश पाटीलसह या विभागातील नेते, कार्यकर्ते, ग्रामपंचायत पदाधिकारी व नागरिक आदी उपस्थित होते.

## माथेरान घाटात कारला अपघात; प्रवासी सुखरूप

**माथेरान : बातमीदार**



नेरळ माथेरान घाटात पर्यटकाच्या वाहनाला भीषण अपघात घडला. सुदैवाने या अपघातात कुठलीही जीवित हानी झाली नसली तरी दैवबलवत्तर म्हणून यातील सर्व प्रवाशी सुखरूप बचावले आहेत.

चालकाचे वाहनावरील ताबा सुटल्याने कार रस्त्याच्या कडेला असणाऱ्या सुरक्षा कठड्यावरून आदळून खालच्या रस्त्यावर येवून आपटली.यामध्ये कारचे मोठे नुकसान झाले. कार रस्त्यातच मध्ये असल्याने येणाऱ्या वाहनांना काही काळ अडथळा निर्माण झाला होता.

ईनोवा कार मधील पर्यटक हे माथेरान फिरून परतीच्या प्रवासाला नेरळ दिशेने निघाले होते. माथेरान घाट उतरत असताना कड्यावरचा गणपतीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या वळणावर कार चालकाचे नियंत्रण सुटले आणि कार रस्ता सोडून सुरक्षा कठडा चढून खालच्या वळणावरील रस्त्यात आदळली. यामध्ये कारचे नुकसान झाले,परतू कारमधील पर्यटक सुखरूप होते. दैवबलवत्तर म्हणून या वेळी समोरून कुठलेही वाहन आले नाही. खोल दरीदेखील बाजूला नसल्याने मोठा अनर्थ टळला.दरम्यान वाहनातील पर्यटक घाबरून दुसऱ्या वाहनात बसून कार तिथेच सोडुन गेल्याची माहिती समोर आली.

दरम्यान, पर्यटकांच्या बाबत कुठलीही माहिती मिळालेली नाही. नेरळ पोलीस ठाण्यात देखील कुठली तक्रार देण्यात आली नसल्याची माहिती यावेळी नेरळ पोलीस ठाण्याचे पोलिस अधिकारी शिवाजी ढवळे यांनी दिली आहे.

## मुंबई-पुणे रस्त्यावरील वावंढळ पुलाची रेलिंगची उंची कधी वाढवणार?

**चौक : प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार म्हणजे जुना मुंबई पुणे रस्त्यावर वावंढळ गावच्या हद्दीत असणाऱ्या पुलाची रेलिंग खूपच कमी असल्याने भितीचे वातावरण असते. त्यामुळे या कट्ट्यावर रेलिंग करावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रदीप गोंधळी यांनी केली आहे

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार वरती वावंढळ हद्दीत वावंढळवाडी जवळून वाहणाऱ्या नदीवर ब्रिटिश कालीन पुल आहे. या पुलाचा उल्लेख वावंढळवाडीचा पुल म्हणुन केला जातो.पनवेल कडून खोपोली दिशेला जाताना असणाऱ्या या पुलाची उंची तीस फुटा पेक्षा जास्त आहे.खाली संपूर्ण खडक आहे. साधारण एक फूट उंच असलेल्या रेलिंग मुळे या पुलावरून चालताना एखादा पादचारी घाबरून पडल्यास त्याचा जीव जाउ शकतो

खोपोलीकडून पनवेलकडे जाताना या पुलाला जोडूनच पुल बांधण्यात आला

असून त्याचे रेलिंग व्यवस्थित उंच आहे. याच पुलावरून राज्य परिवहन विभागाची बस पुलाखाली पडून अनेकजण मृत्यमुखी पडले होते, या रस्त्याने मोटार सायकलने जाताना खूपच घाबरल्यासारखे नेहमीच वाटते,त्यामुळे या कट्ट्यावर रेलिंग करावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रदीप गोंधळी यांनी केली आहे.



## श्री अष्टविनायक पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन



**नागोठणे : बातमीदार**

नागोठणेसह रोहा तालुक्यात नावाजलेली पतसंस्था श्री अष्टविनायक ग्रामीण बिगरशेती पतसंस्था नागोठणेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन पतसंस्थेच्या कार्यालयात सोमवारी (दि.३०) पतसंस्थेच्या मासिक सभेचे औचित्य साधून करण्यात आले.

दरम्यान, पतसंस्थेची प्रगती, वाटचाल व कारभार चांगल्या पद्धतीने चालला असल्याची माहिती आमचे सभासद, ठेवीदार, खातेधारक, गुंतवणूकदार, कर्जदार व हितचिंतक यांना मिळावी म्हणून आम्ही संचालक मंडळ आपल्या स्वखर्चाने प्रतीवर्षी दिनदर्शिका छापून वाटप करत असल्याची माहिती श्री अष्टविनायक पतसंस्थेचे अध्यक्ष विलास चौलकर यांनी पत्रकारांना दिली.

श्री अष्टविनायक ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेच्या दिनदर्शिकेच्या प्रकाशन सोहळ्याच्या वेळी पतसंस्थेचे अध्यक्ष विलास चौलकर, संस्थापक अध्यक्ष जयराम पवार, सचिव प्रफुल नागोठणे, संचालक दिनेश घाग, प्रकाश जाधव, राजेंद्र गायकर, दिलीप धाडसे, संतोष चितळकर, संचालिका श्वेता विलास चौलकर, संध्या संजय सांगले, व्यवस्थापिका शैला घासे, सभासद जगदीश चौलकर व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## खोपोली नगर परिषदेत तीन कर्मचाऱ्यांच्या वारसांना सफाई कामगार पदावर नियुक्त्या



**खोपोली : रामप्रहर वृत्त**

खोपोली नगर परिषदेमध्ये कै. सुधाकर दामू जाधव, कै. हरिभाऊ गोविंद शिंदे व सफाई कामगार या पदावर कार्यरत असणारे अशोक गणपत पवार हे नगरपरिषद सेवेतून सेवा निवृत्त झालेले आहेत. तसेच कै. सुधाकर दामू जाधव, कै. हरिभाऊ गोविंद शिंदे हे सेवेत असताना मृत्यू पावलेले आहेत.

शासन धोरणानुसार व लाड समितीच्या शिफारशीनुसार संबंधीत सफाई कामगाराच्या जागी त्यांच्या वारसाची नियमानुसार सफाई कामगार या पदावर नियुक्ती देता येते. त्यानुसार खोपोली नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी १ जानेवारी २०२५ रोजी उपरोक्त कर्मचारी याचे वारस अमित अशोक पवार, राज हरिभाऊ शिंदे व लवकेश सुधाकर जाधव यांना वारसाहक्काने सफाई कामगार या पदावर नियुक्ती दिलेली आहे. या वेळी खोपोली नगरपरिषदेचे उपमुख्याधिकारी रणजित पवार हे उपस्थित होते. याबाबत सदर नियुक्त कर्मचारी यांनी मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांचे आभार मानले.



## प्रधान मंत्री निक्षय पोषण योजनेतून खालापूर येथे पोषण आहार वाटप

**चौक : प्रतिनि**

प्रधानमंत्री निक्षय पोषण योजने अंतर्गत खालापूर तालुक्यातील क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत मध्ये येणारे क्षयरोग रुग्ण यांना कोरडा आहार(फूड बास्केट) याचे वाटप खालापूर तहसीलदार अभय शिवाजीराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.



पूरक पोषण आहार रोगापासून व्यक्तीला दूर ठेवण्यास मदत करतो. त्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार क्षय रुग्णांसाठी निक्षय पोषण योजना आधार ठरत आहे. एप्रिल २०१८ पासून ही योजना केंद्र सरकारने कार्यान्वीत केली आहे. प्रामुख्याने संसर्गातून हा आजार होता. बहुतांश वेळा प्रतिकार शक्तीची कमतरतेमुळे व्यक्ती या आजाराला बळी पडतो. थुंकीचे नमुने, एक्सरे काढल्यानंतर तपासणी अंती क्षयरोगाचे रुग्ण निदर्शनास येतात. खान पानात झालेला बदलामुळे प्रतिकारशक्ती कमी झाल्याने हा आजार बळावतो. असे डॉ.अनिलकुमार शहा यांनी सांगितले.अशा बाधीत रुग्णांसाठी केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सुचनेनुसार एक एप्रिल २०१८ पासून उपचारावरील सर्व क्षय रुग्णांसाठी निक्षय पोषण आहार योजना अर्थात पोषण आहार भत्ता योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेतंर्गत नियमित उपचार घेणाऱ्या क्षय रुग्णांना उपचार कालावधीत यात ५०० रुपये दरमहा पोषण आहार भत्ता देण्यात येतो. आदीवासी भागा करीता हा भत्ता ७५० रुपये आहे पोषण युक्त आहार या रुग्णांना मिळावा व त्यांचे आरोग्य सुधारावे हा सकारात्मक दृष्टीकोण समोर ठेऊन महानगर गॅस यांच्या सहकार्याने, डॉ.अनिलकुमार यांनी राबविलेला उपक्रम स्तुत्य आहे, असे प्रतिपादन तहसीलदार अभय चव्हाण यांनी केले.

यावेळी खालापूर वरीष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार,आरोग्य अधिकारी डॉ.अनिलकुमार शहा, नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांच्या हस्ते पोषण आहार वाटप करण्यात आले. यावेळी पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष अनंत ठोंबरे, सुरज तडवी(MO Khalapur), महेंद्र पिंगळे ,समाधान धनवे,हनुमंत गोवारी,स्वाती गावडे यांच्या सह आरोग्य कर्मचारी,रुग्ण उपस्थित होते.

## दुचाकीची ट्रॅक्टरला ठोकर; दुचाकीस्वाराचा मृत्यू, एक जखमी

**माणगांव :** दुचाकीची ट्रॅक्टरला ठोकर लागल्याने दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला असून एक जण जखमी झाला दुर्गेश हंबीर आपल्या ताब्यातील स्कुटी अतिवेगाने, रस्त्याचे परस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवत असताना ट्रॉलीस ठोकर लागल्याने दुचाकीस्वार दुर्गेश हंबीर याचा मृत्यू झाला असून निकेश किशोर बांगारे जखमी झाला.

## अंजुमन महाविद्यालयात सामूहिक वाचन व वाचनाचे महत्त्व कार्यक्रम उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी तसेच भावी उत्कृष्ट लेखक निर्माण करता यावे यासाठी अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरुड जंजिरा या महाविद्यालयात सामूहिक वाचन व वाचनाचे महत्व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



नववर्षाच्या सुरुवातीलाच वाचनसंस्कृतीला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या माध्यमातून '' वाचन संकल्प महाराष्ट्राचा '' हा व्यापक उपक्रम दि. १ जानेवारी २०२५ ते १५ जानेवारी या कालावधीत राबविण्यात येत आहे. अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरुड जंजिरा या महाविद्यालयात कोंकण विभागाचे सहसंचालक डॉ. विजय नारखेडे, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. साजिद शेख व ग्रंथालय समिती यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. बुधवार (दि.१) जानेवारी रोजी विद्यार्थ्यांसाठी सामुहिक वाचन तसेच वाचनाचे महत्व या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्यासंख्येने उपस्थित होते. हा स्तुत्य उपक्रम विद्यार्थ्यांना वाचनातून नवी दिशा देणारा ठरणार आहे असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. साजिद शेख यांनी केले. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी ग्रंथालय समिती प्रमुख प्रा. अलताफ फकीर, डॉ. फिरोज शेख , प्रा. जावेद खान व ग्रंथपाल प्रा. अंजुम दाखवे यांनी विशेष प्रयत्न केले.


### जाहीर नोटीस

सदर जाहीर नोटीशी व्दारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, **मौजे. बेलोंडाखार येथिल खालील वर्णनाची मिळकत श्रीम. लाडकुबाई चंद्रकांत ठाकुर, श्री. विजय चिंतामण तांडेल, श्रीम. यमुना बाबु कोळी** यांचे ताबेकब्जा व मालकी हक्कात होती. सदर मिळकत खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.नु | मौजे | सर्वे नं | हिस्सा नं | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | बेलोंडाखार | १५ | ३ | ०.३४.८०<br>पो.ख ०.०३.०० |

सदर मिळकती पैकी ६ गुंठे हे. आर एवढया क्षेत्राचा संदर्भात खरेदीखत व सातबारा आमच्या आशिलांच्या नावे होण्यासाठी श्रीम. लाडकुबाई चंद्रकांत ठाकुर, श्री. विजय चिंतामण तांडेल, श्रीम. यमुना बाबु कोळी यांनी पुर्णपणे संमती दिलेली आहे.
वर नमुद जमिन मिळकत ही उरण सब रजिस्टार यांचे अधिपत्या खालील आहे. वरिल नमुद मिळकत आमचे आशिलंना विकत घ्यायची आहे. सदरकामी आमचे अशील यांना वरील नमुद मिळकतीचे ताबे कब्जा धारक यांचे सोबत आमचे आशीलांना करारनामा करुन घ्यावयाचा आहे.

वर नमुद मिळकती संदर्भात कोणाचाही हक्क, अधिकार असल्यास तसेच कोणत्याही प्रकारचा करार अथवा गहाण खत, खरेदी खत, साठे करार तसेच बंक्षीस पत्र अथवा इतर कोणताही करार झालेला असल्यास तसेच कोणाचेही सदरील मिळकती संदर्भात देणे लागत असल्यास अथवा कोणाचीही हरकत असल्यास ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी हरकती घेण्यात यांव्यात अथवा समक्ष येवुन भेटावे. सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास कोणाचाही वर नमुद मिळकती मध्ये मालकी हक्क व अधिकार नाही असे समजले जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
अॅड. नेहा अ. नाईक
ऑफिस : गाळा नं. २, अर्श टॉवर,
उरण कोर्टाच्या बाजुला, उरण
जि. रायगड ४००७०२



### दि पनवेल कॉ ऑप अर्बन बँक लि. पनवेल
**सर्व ग्राहकांसाठी जाहीर नोटीस**

बँकेतील आपल्या खात्यासाठी (KYC) कागदपत्रांबरोबर E-mail-Id, संपर्क क्रमांक, वारसदारांचे नामांकन अद्यावत करणे तसेच लॉकर वापरण्याबाबतच्या सुचना.

बँकेच्या सर्व खातेदारांना कळविण्यात येते कि, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे तसेच Prevention of Money Landing Act 2002 (as amended) च्या तरतुदीप्रमाणे बँकेच्या मागणीनुसार आणि special केसमध्ये KYC अद्यायावत कागदपत्र आपणास सादर करणे बंधनकारक आहे.

१) लॉकरधारक :- आपण जर लॉकर सुविधा वापरत असाल तर नवा लॉकर भाडे करार केला आहे का याची बँकेत येवून खात्री करावी तसेच आपले लॉकर आपण वर्षभरात किमान दोन वेळा वापरावे.

२) Inoperative / Dormant खात्यासाठी :- आपले खाते आपण कोणत्याही कारणाने सलग २ वर्षे वापरले नसेल तर सदर खाते Inoperative / Dormant म्हणून गणले जाते. सदर खाते परत चालू करण्याकरीता (कार्यान्वित) आपण शाखेत असलेले निर्धारित फॉर्म भरून व आपले KYC ची कागदपत्रे सादर करून आपले व्यवहार नियमित चालू करावे.

३) Updation of E-mail-Id / Mobile No / Nominee :- सायबर फसवणुकीचा धोका टाळण्यासाठी तसेच आपल्या खात्याच्या सुरक्षीततेसाठी १) आपला ई मेल व मोबाईल नंबर नोंदवा. २) आपले खाते नामांकन फॉर्म भरून नोंदवा.

४) KYC / C-KYC :- रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार आपण खाते उघडताना आपली KYC कागदपत्रे बँकेस सादर करणे अनिवार्य आहे. त्यानुसार आपल्या खात्याची जोखीम वर्गीकरण केले जाते. आपल्या KYC कागदपात्रांची मुदत संपली असेल अथवा दि.३१.०३.२०२५ अखेर मुदत संपत असेल तर आपणास विनंती आहे कि, आपण KYC C know your customer / OVD officially valid document च्या - पूर्ततेकरीता नोटीस दिनांकापासून ३० दिवसाचे आत अद्यावत KYC कागदपत्रे आपल्या शाखेत सादर करावीत. वरील कालावधीत आपण कागदपत्रे सादर केली नाहीत तर बँकेस आपल्या खात्यावरील व्यवहार नाईलाजास्तव थांबवावे लागतील. जर आपल्या कागदपत्रांमध्ये काहीही बदल नसल्यास (उदा. नॉमिनी / मोबाईल नंबर / घरचा पत्ता वगैरे) तर C-KYC करण्यासाठी ''No Change Form '' भरून द्यावा. आपले खाते आमच्या बँकेसाठी बहुमूल्य आहे. ते खाते व्यवहारपूर्ण चालू राहावे यासाठी आपल्या सहकार्याच्या अपेक्षेसह आपण आपल्या शाखा व्यवस्थापकांशी संपर्क साधावा असे सूचित करण्यात येत आहे.

ठिकाण :- पनवेल
दिनांक :- ०१.०१.२०२५

सही/-
अजय कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी
दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि

# प्रदुषण नियंत्रणासाठी नवी मुंबई सरसावली

## सलग १५ दिवस असणार नियोजन



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहराचे स्वच्छतेतील मानांकन उंचावण्याच्या दृष्टीने लोकसहभागातून स्वच्छता मोहीमा राबविल्या जात असतानाच महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली धुळीचे प्रदूषण कमी करण्यासाठी मुख्य रस्ते व पदपथ यांची सखोल स्वच्छता करण्यासाठी विशेष मोहीम (Deep Cleaning Drive) आखण्यात आलेली आहे. ३० डिसेंबर ते १३ जानेवारी या कालावधीत संपूर्ण महापालिका क्षेत्रात विविध रस्ते सफाईच्या सखोल स्वच्छता मोहीमांचे विभागनिहाय बारकाईने नियोजन करण्यात आले असून त्याच्या अंमलबजावणीला अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचराव्यवस्थापन विभागाचे परिमंडळ १ उपायुक्त डॉ. अजय गडदे व परिमंडळ २ उपायुक्त संतोष वारुळे यांच्या माध्यमातून सुरुवात झालेली आहे.

यामध्ये प्रामुख्याने रस्त्यांच्या व पदपथांच्या कडेला घट्ट झालेली माती मनुष्यबळाद्वारे साफ करण्यात येत असून त्यानंतर अत्याधुनिक फॉगर्स मशीनद्वारे पाणी मारुन रस्त्यांची सफाईदेखील केली जात आहे. याकरिता महापालिकेच्या मलप्रक्रिया केंद्रातून शुद्ध केलेल्या प्रक्रियाकृत पाण्याचा वापर करण्यात येत असल्याने पिण्याच्या पाण्याची बचत होत आहे. त्याचप्रमाणे हवेतील धूळीचे प्रमाणही कमी होउन नवी मुंबईच्या हवा गुणवत्तेत सुधारणा होत आहे.

या डिप क्लीनिंग मोहिमेचा विभागनिहाय आराखडा तयार करण्यात आला असून प्रत्येक दिवशी सखोल स्वच्छता करण्याचा रस्ता व परिसर निश्चित करण्यात आला आहे. यामध्ये ३० डिसेंबर रोजी आम्र मार्ग उरणफाटा (बेलापूर विभाग), टी जंक्शन ते दिवा सर्कल (ऐरोली विभाग) या ठिकाणी सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. ३१ डिसेंबर रोजी अक्षर टॉवर रस्ता (बेलापूर विभाग), वाशी गाव प्रवेशव्दार ते नाखवा चौक तसेच वर्धमान पार्क ते बॉम्बे नेक्स सेक्टर १७ (वाशी विभाग), कोपरी तलाव परिसर (तुर्भे विभाग), कोपरखैरणे स्टेशन रोड (कोपरखैरणे विभाग), कुलसूम हॉटेल ते बर्गर किंग सेक्टर ३ रेल्वे स्टेशन समोर (घणसोली विभाग) व दिघागाव कमान ते हिंदमाता शाळा (दिघा विभाग) या ठिकाणी सखोल स्वच्छता मोहीमेचे नियोजन करण्यात आलेले आहे.

नव्या वर्षाच्या प्रारंभी हवेची गुणवत्ता वाढ आणि स्वच्छ नवी मुंबईचा निर्धार करुन हा संकल्प प्रत्यक्षात उतरविण्यासाठी अधिक प्रभावी काम करण्याच्या दृष्टीने १३ जानेवारीपर्यंत सखोल स्वच्छता मोहीमांचे विभागनिहाय नियोजन करण्यात आलेले आहे.

१३ जानेवारीपर्यंत सलग १५ दिवस सर्वच आठही विभागांमध्ये सखोल स्वच्छता मोहीमा (Deep Cleaning Drive) प्रभावीपणे राबविण्याचे नियोजन करण्यात आले असून यामुळे मुख्य रस्ते, पदपथ याठिकाणी साठलेले मातीचे थर, धूळ यांची मनुष्यबळाव्दारे तसेच यांत्रिक वाहनांव्दारे सखोल स्वच्छता होणार आहे शिवाय हवेतील धुळीचे प्रमाण कमी होउन नवी मुंबईतील हवा गुणवत्ता सुधारण्यासही मदत होणार आहे.

तरी नवी मुंबईकर नागरिकांनी या सखोल स्वच्छता मोहीमेस सहकार्य करावे व आपले नवी मुंबई शहर स्वच्छ व सुंदर म्हणून मानांकित होण्यासाठी कचऱ्याचे घरातच वर्गीकरण करणे, हा वेगवेगळा कचरा वेगवेगळ्या स्वरुपातच कचरा गाडीत देणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे, प्लास्टिक पिशव्या व एकल वापर प्लास्टिकचा वापर पूर्णत: टाळणे या सवयींचा अंगीकार करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# दारू पिऊन वाहन चालवणाऱ्यांवर कारवाई

## २६६ जणांवर बडगा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**


नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरात ३१ डिसेंबर निमित्त विशेष बंदोबस्त लावण्यात आला होता.

या वेळी वाहतुकीचे नियम न पाळणा-या वाहन चालकांविरुध्द कारवाई करण्यात आली. यामध्ये दारू पिऊन वाहन चालवणाऱ्या २६६ जणांवर कारवाई करण्यात आली आहे, अशी माहिती पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी दिली.

नवी मुंबई पोलीस आयुक्तांच्या आदेशाने काल दिवसभर आणि आज पहाटेपर्यंत ही विशेष मोहीम घेण्यात आली. या बंदोबस्ताच्या वेळी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील वाहतूक विभागाकडून २ हजार ३५७ वाहन चालकांवर मोटर वाहन कायदा कलमान्वये कारवाई करण्यात आली. तसेच यापुढेही वाहतुकीचे नियमांची न पाळता बेजबाबदारपणे वाहन चालवणा-या वाहनचालकांवर वेळोवेळी कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे वाहन चालकांनी वाहतुकीचे नियमांचे पालन करावे आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यात नवी मुंबई वाहतुक विभागास सहकार्य करावे, असे आवाहन काकडे यांनी केले आहे.

कारवाई पुढील प्रमाणे

दारू पिऊन वाहन चालवणाऱ्या ३२ जणांवर सर्वात अधिक कारवाई तुर्भे विभागाच्या वाहतूक शाखेने केली. गव्हाण फाटा वाहतूक शाखेने सर्वात कमी केवळ पाच जणांवर कारवाई केली.



# पनवेल तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात आगरी शिक्षण संस्थेचे यश

**कळंबोली : बातमीदार**

५२ वे पनवेल तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन पनवेल पंचायत समिती शिक्षण विभाग, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल उलवे व पनवेल गणित विज्ञान अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने २७ व २८ डिसेंबर २०२४ रोजी उलवे येथे पार पडले.

प्रश्नमंजुषा या स्पर्धेत आगरी शिक्षण संस्थेचे माध्यमिक विद्यालय खांदा कॉलनी नवीन पनवेल येथील अभिषेक सुरेश दहिफळे या विद्यार्थ्याने तृतीय क्रमांक पटकावला.

या विद्यार्थ्यास शाळेतील विज्ञान शिक्षिका स्मिता पाटील यांनी मार्गदर्शन केले. विद्यालयाचे प्राचार्य पंकज भगत यांनी सदर विद्यार्थ्याचे पारितोषिक मिळवल्याबद्दल अभिनंदन केले.

# मैदानाचा भुखंड सारसोळे ग्रामस्थांना देण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडकोचा नेरूळ सेक्टर १२ येथील मैदानाचा भुखंड सारसोळे ग्रामस्थांना द्या, अशी मागणी माजी प्रभाग समिती सदस्य मनोज मेहेर यांनी आमदार मंदा म्हात्रे यांच्याकडे केली आहे.

सिडकोचा नेरूळ सेक्टर १२ येथे भुखंड आहे. हा भुखंड मैदान म्हणून वापरला जातो. रामलीला मैदान असे नामकरण या भूखंडाचे करण्यात आले आहे. नेरूळ सेक्टर-१२ येथील श्री गणेश रामलीला मैदानातील बहुतांश भाग हा मनमानी पद्धतीने एका खाजगी शिक्षण संकुलास करारपद्धतीने वापरण्यास दिला आहे. त्यामुळे या मैदानाचे नवी मुंबई महानगरपालिकेला सुशोभीकरण व सुसज्ज क्रीडांगण बनवण्यास अडचण निर्माण होत आहे.

या मैदानावर सतत मैदान भाड्याने घेऊन क्रिकेट सामने भरवले जातात. त्यामुळे सारसोळे गावातील खेळाडूंना खेळण्यास मिळत नाही. या सर्व बाबी पाहता हा मैदानाच्या भुखंडाचा सिडकोने तेरणा संस्थेसोबत केलेला करार रद्द करून हे मैदान पालिकेकडे हस्तांतरित करावे जेणेकरून या मैदानाचा क्रीडांगण म्हणून विकास करता येईल, अशी मागणी माजी प्रभाग समिती सदस्य मनोज मेहेर यांनी आमदार मंदा म्हात्रे यांच्याकडे केली आहे.

सिडकोने हे क्रीडांगण नवी मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरित करावे, अशी मागणी मेहेर यांनी केली आहे. हे क्रीडांगण मनपाकडे हस्तांतर केल्यास ते सारसोळे गावातील स्थानिक खेळाडूंना उपलब्ध होईल, असे मेहेर यांनी म्हटले आहे.



# नववर्षानिमित्त चिरनेर महागणपती दर्शनासाठी गर्दी

**चिरनेर : रामप्रहर वतीत्त**

चिरनेर महागणपती तीर्थक्षेत्रात नववर्षा निमित्ताने बुधवारी (दि.१) जानेवारी रोजी गणेशभक्तांनी प्राचीन श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. पहाटेपासूनच श्रींच्या दर्शनाला सुरुवात झाली होती.

उरण तालुक्याबरोबर पनवेल, नवी मुंबई, मुंबई, ठाणे, कल्याण, येथील गणेश भक्तांनी श्री महागणपतीचे मनोभावे दर्शन घेतले. दरम्यान, हार, नारळ, गावठी भाज्या, मातीची भांडी तसेच हॉटेल व्यवसायिकांचा धंदा तेजित असल्याचे दुकानदार प्रणोती पाटील हिने सांगितले.

# उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले सेवानिवृत्त

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजचे उपमुख्याध्यपक प्रमोद मंडले हे संस्थेतील ३१ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार मंगळवारी (दि.३१) सेवानिवृत्त झाले.



विद्यालयाच्या वतीने त्यांना यशस्वी सेवापूर्ती निमित्त पुष्पगुच्छ,स्मृतिचिन्ह आणि स्नेहवस्त्र देऊन सन्मानित करण्यात आले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रविंद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे,सागर रंधवे, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे,ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील व इतर शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



**चौक : भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. या वेळी उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांनी ठोंबरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सोबत खालापूर मंडल प्रभारी प्रवीण मोरे.**

# नवी मुंबई विमानतळातील नोकऱ्यामध्ये स्थानिकांना प्राधान्य देण्याची मागणी

**उरण : बातमीदार**

लोकनेते दि.बा. पाटील नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळात स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात यावी तसेच स्थानिक भूमीपुत्रांना त्वरित नोकरीत सामावून घ्यावेत, अशी मागणी उलवे शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (अजितदादा पवार गट) चे शहर अध्यक्ष संतोष काटे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री सुनिल तटकरे, प्रशासकीय अधिकारी श्रीकर परदेशी यांच्याकडे पत्रव्यवहाराद्वारे केली आहे.

गेली अनेक वर्षे सुरू असणारे स्व. दि. बा.पाटील नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळचे काम आता पूर्णत्वाकडे असून या ठिकाणी विविध कामासाठी कुशल-अर्धकुशल- अकुशल अशा विविध प्रकारचा रोजगारासाठी स्थानिक रहिवाशी व स्थानिक भूमिपुत्र अशा तरुणांना - तरुणींना संधी मिळणे गरजेचे आहे.

स्थानिक तरुण मोठया प्रमाणात बेरोजगार असून बेरोजगारीचा प्रश्न त्वरित निकाली लागल्यास येथील बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध होऊन त्यांच्या अनेक समस्या मार्गी लागतील अशी आशा बेरोजगारांनी व्यक्त केली आहे.



**पनवेल : भाजप गव्हाण जिल्हा परिषद कमिटी वतीने उलवे नोडमध्ये बुधवारी स्थापन झालेल्या जैन मंदिराचे दर्शन घेण्यात आले. या वेळी अमर म्हात्रे, ॲड. सुनील कुमार मौर्य, मदन पाटील, अवधेश महतो, संकल्प घरत, संतोष तुडमे, अमित नाईक, विलास चंदेल, उदय पांडे, देवालय मित्रा, मयुरेश म्हात्रे, सुनील कुमार मौर्य, अर्चना चौहान, सुनंदा म्हात्रे, प्रल्हाद सगर, राजरत्न पिल्लयी, शेखर नदार, अजय हेगटकर, गोपी भोईर, प्रीतम घरत व मंदिर व्यवस्थापक तुषार जैन आदी उपस्थित होते.**



# दारावे येथील कॉलेजचे स्नेहसंमेलन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

विद्यावर्धिनी संस्थेचे गुरुवर्य बाळाराम पाटील विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, दारावे नेरूळ यांचे ३१ वे शालेय वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

प्रारंभी, संस्थेचे अध्यक्ष आणि माजी नगरसेवक सुनील पाटील यांच्या हस्ते या वार्षिक स्नेहसंमेलनाचे शुभारंभ करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे खजिनदार विकास पाटील, सचिव विकास नाईक, अनंत नाईक, सत्यवान पाटील, अंकुश भोईर, माजी नगरसेविका सरस्वती पाटील, मीना पाटील, मनोज नाकती आदी उपस्थित होते.

या वेळी विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनात्मक सांस्कृतिक नृत्य रंगमंचावर सादर केले. या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यावर्धिनी संस्थेचे अध्यक्ष सुनील पाटील यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना मोलाचे मार्गदर्शन केले तसेच संस्थेच्या सर्व पदाधिकारी आणि विद्यार्थ्यांचा सन्मान केला. विद्यार्थ्यांचा रंगमंचावर विविध कलागुणांचा अविष्कार सादर होत असताना इयत्ता पाचवी सहावी सातवीच्या विद्यार्थ्यांनी सीमेवर भारत मातेच्या रक्षणार्थी लढणाऱ्या वीर जवानाची कथा हुबेहूब सादर केली. विशेष म्हणजे या कार्यक्रमात व्यसनमुक्ती विषयी नाटकाद्वारे जनजागृती व संदेश देण्यात आला. दारू, तंबाखू, ड्रग्स, गुटखा, सिगरेट आणि पान या सारख्या व्यसनापासून दूर रहावे. व्यसन हे जीवनाला किती घातक असते त्याचे चित्र विद्यार्थ्यांनी हुबेहूब रंगमंचावर सादर केले.

शाळेचे मुख्याध्यापक अविनाश पवार सरांनी शाळेची सुरुवात आणि सद्यस्थितीत शाळेचे असलेली प्रगती आपल्या मनोगतातून सादर केली. या शाळेमधून शिक्षण घेऊन बाहेर पडलेले विद्यार्थी आज वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये प्रगतीपथावर आहेत.

पोलीस क्षेत्रात आमच्या शाळेचे वीस विद्यार्थी रक्षणार्थ कार्यरत आहेत हे शाळेचे मुख्याध्यापक अविनाश पवार सरांनी आवर्जून पालकांसमोर मनोगत व्यक्त केले. या वेळी शाळेचे शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रुपेशबुवा पाटील यांना पखवाज भूषण पुरस्कार



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील आघाडीचे पखवाज वादक रुपेशबुवा पाटील यांना नुकताच पारस काव्य, कला, जनजागृती संस्था, नवी मुंबईचा २०२४ चा मानाचा पखवाज भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर मंगेश चांदीवडे, दामोदर बेडेकर, शोभा चांदीवडे, कवी पुंडलिक म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

अर्जुनबुवा भोईर, राजारामबुवा सारडेकर, विश्वनाथबुवा पाटील यांचे पट्टशिष्य असलेल्या रुपेशबुवा पाटील यांनी गेल्या ३० वर्षात महाराष्ट्रातील आघाडीच्या बहुतांश भजन गायक कलावंतांना, कीर्तनकारांना पखवाज वादनाची रंगदार साथ - संगत केलेली आहे. रुपेशबुवा यांचे कॅसेट, सीडी, आकाशवाणी, दूरदर्शनवरही अनेक कार्यक्रम झालेले असून नवी मुंबईच्या भजन, कीर्तन चळवळीत महत्वाचे योगदान आहे.

# कवी पुंडलिक म्हात्रे यांना पुरस्कार

**उरण : वार्ताहर**

पारस काव्य कला जनजागृती संस्था नवी मुंबईच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चौदाव्या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रसिद्ध आगरी कवी पुंडलिक म्हात्रे यांना पारस काव्य कला जनजागृती संस्थेच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा जागतिक कीर्तीचा कवी पुरस्कार, समारंभपूर्वक मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



हा कार्यक्रम शनिवार (दि.२८) डिसेंबर रोजी बाबासाहेब आंबेडकर समता भवन सेक्टर १० सानपाडा, जुईनगर रेल्वे स्टेशन (पश्चिम) नवी मुंबई येथे झाला. या वेळी त्यांना संस्थापक अध्यक्ष मंगेश चांदीवडे यांच्या हस्ते आणि विश्वभूषण पुरस्काराचे मानकरी संजय बर्वे, प्रा. सुनील चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते विजय शिरढोणकर, सामाजिक कार्यकर्ते श्री नेवरेकर, कवी शंकर गोपाळे, खजिनदार शोभा चांदिवडे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

# गोमांस वाहतूकप्रकरणी दोघांना पकडले





**नेरळ : प्रतिनिधी**

राज्यात गाय- बैलांची कत्तल बंद असताना रिक्षातून ५० किलो गोमांस घेवून जाणाऱ्या दोन जणांना नेरळ पोलिसांनी पकडले आहे. ही घटना सोमवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास कर्जत कल्याण राज्य मार्गावरील नेरळ पोलीस ठाणे हद्दीत घडली होती.

नेरळ पोलिसांच्या सतर्कतमुळे गोमांस घेवून जाणारे पकडले गेले. दरम्यान, हे गोमांस नेरळ जवळील दामत गावातून आणण्यात आले असून ते नवी मुंबई येथे घेवून जात असताना नेरळ पोलिसांनी धडक कारवाई केली. एकीकडे थर्टीफर्स्टची धामधूम सुरू असताना दुसरीकडे कर्जत तालुक्यात मोठ्या प्रमाणात गोहत्या करून त्याचे मांस विक्रीसाठी तालुक्या बाहेर गुपचूप जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. रस्त्यावर फिरणाऱ्या गोवंशिय जनावरांना पकडुन त्यांची हत्या करण्यात येत असून त्यांचे मांस विक्रीसाठी पाठवले जात आहेत. दरम्यान, कर्जत नागुर्ले येथील घटना ताजी समोर असताना नेरळ येथून गोमांस खरेदी करून कर्जत कल्याण राज्य मार्गावरून नवी मुंबई येथे जात असताना नेरळ पोलिसांनी दृष्टी हॉटेल समोर वाहनासहित गोमांस ताब्यात घेतले. ऑटो रिक्षा (एमएच ४६ सी ०३६६) या वाहनात ५० किलो वजनाचे गोमांस चार वेगवेगळ्या पिशवीत बांधण्यात आल्याचे पोलिसांना सापडले आहे. तर या वेळी नवी मुंबई नेरूळजवळील सेंट झेवेलीस स्कूल परिसरात राहणारे ५६ वर्षीय मुस्ताक शफीक पटेल आणि ४० वर्षीय फरमान इस्माईल शेख या दोन व्यक्तींना ऑटो रिक्षा सोबत नेरळ पोलिसांनी रंगेहाथ पकडले आहे. दरम्यान, हे गोमांस दामत गावातून मुसा भाई यांच्याकडून खरेदी केल्याची कबुली पकडण्यात आलेल्या दोन आरोपी व्यक्तींनी नेरळ पोलिसांना या वेळी दिली. गोमांस यांसह ऑटो रिक्षा असा ऐकून ९० हजारच्या आसपास मुद्देमाल पोलिसांनी पकडला असल्याचे सांगण्यात आले आहे. याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम १९९५ चे कलम ५ (क) चे उल्लंघन ९ अ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास नेरळ पोलीस ठाण्याचे पोलिस अधिकारी शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार वाघमारे करीत आहेत.

थर्टीफर्स्टच्या धामधुमीत कर्जत तालुक्यात मोठ्या प्रमाणत गोवंशिय जनावरांची कत्तल होत असल्याने आता गोरक्ष प्रेमींकडून याबाबत तीव्र संताप व्यक्त केला जात असून असा नराधमांवर कडक कारवाई केली जावी म्हणून सांगण्यात येत आहे.

# चौक बाजारपेठ ते शासकीय कार्यालयाच्या रस्त्याची दुरुस्ती

## आमदार महेश बालदी यांचा पाठपुरावा

**चौक : प्रतिनिधी**

आमदार महेश बालदी यांनी चौक बाजारपेठ ते शासकीय कार्यालये असलेल्या रस्त्याची दुरवस्था झाली होती. नुकतेच या रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळून त्याची दुरूस्ती होत असल्याने नागरिकांच्या समाधान व्यक्त होत आहे.



खालापूर तालुक्यातील चौक बाजारपेठ ही ग्रामीण भागातील सर्वात मोठी बाजारपेठ आहे. या बाजारपेठेमधून जाणारा रस्ता ग्रामीण रुग्णालय चौक, ग्रुप ग्रामपंचायत चौक व तुपगाव कार्यालय, पशु वैद्यकीय दवाखाना, शासकीय धान्य गोदाम, सर नोबत नेताजी पालकर विद्यालय, यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय, नागरी वसाहत, मंडळ अधिकारी कार्यालय चौक, तलाठी सजा तुपगाव, चौक यांची कार्यालये आहेत.

हा रस्ता अतिशय खराब अवस्थेत होता. त्यामुळे विद्यार्थी,नागरिक आणि सर्वांत महत्वाचे रुग्णांना मोठा त्रास होत होता. याची दखल चौक ग्रामपंचायत सरपंच रितू ठोंबरे यांनी घेऊन, त्यांनी उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदि यांना याबाबत निवेदन देण्यात आले होते. आमदार महेश बालदी यांनी या रस्त्याबाबत तातडीने अंमलबजावणी करून त्याला मंजुरी मिळूऊन दिल्याने या रस्त्याच्या कामाला वेग आला आहे. यामुळे येथील नागरिक समाधान व्यक्त केलं जातं आह.

# पालीतील तरुणांचा राष्ट्रवादीत प्रवेश




**पाली : प्रतिनिधी**

सुधागड-पालीचा सर्वांगीण व शाश्वत विकास व्हावा यासाठी सातत्याने योगदान दिले आहे. यापुढेही जनतेला अपेक्षित विकास साधावा यासाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी दिली.

सुधागड तालुक्यातील अडूळसे ग्रामपंचायत उपसरपंच, सदस्य, वाकणगाव आदिवासीवाडी ग्रामस्थ आणि पाली येथील आगरी समाजातील अनेक तरुणांनी नुकताच सुतारवाडी गीताबाग येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. त्या वेळी ते बोलत होते.

विकासाचा दृष्टिकोन समोर ठेवून राष्ट्रवादी सुधागड तालुका अध्यक्ष संदेश शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली व प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, मंत्री अदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या विकासात्मक कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून राष्ट्रवादीत प्रवेश केला असल्याचे उपसरपंच, सदस्य, ग्रामस्थ व तरुणांनी सांगितले.

या वेळी शेवाळे यांच्यासह जिल्हा परिषद गटाचे अध्यक्ष दिनेश बुरूमकर, विजय जाधव, जितेश खंडागळे, रोशन कडू आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# उसरोली हद्दीतील रस्ता दुरुस्ती करण्याची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यामधील उसरोली ग्रामपंचायत हद्दिमधील उसरोली टेप ते ग्रामपंचायत कार्यालय पर्यंत एक किलोमीटर रस्त्याची संरक्षक भिंत वाहून गेल्याने हा रस्ता डाव्या बाजूने पूर्णताह खचला असून हा रस्ता लवकरात लवकर बनवून मिळावा, अशी येथील ग्रामस्थ यांनी मागणी केली आहे.



जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत मोठा पाऊस बरसल्याने येथे ऐकून २८०० मिलिमीटर पेक्षा जास्त पाऊस पडल्याने येथील रस्त्याची संरक्षक भिंत पडल्याने सदरचा रस्ता उघडा बोडका झाला आहे.पावसापूर्वी हा रस्ता होणे खूप आवश्यक आहे.

अन्यथा संपूर्ण रस्त्याला मोठी झळ सहन करावी लागणार आहे. हा रस्ता रोहा सार्वजनिक बांधकाम खात्याशी सलग्न असल्याने त्यांनी याकडे त्वरित लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे. सुपेगाव मार्गे रोहा याच मार्गे वाहतूक होत असते.

मुरूड व रोहा या दोन तालुक्यांना जोडणारा महत्त्वपूर्ण रस्ता गेल्या अनेक महिने दुर्लक्षित राहिला आहे. हा रस्ता तातडीने बनवण्यात यावा व ग्रामस्थ व प्रवासी यांना दिलासा द्यावा, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

# विविध स्पर्धेत राजिप तळाशेत शाळेचे सुयश

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील ना. म. जोशी विद्याभवन गोरेगाव येथे तालुकास्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत केंद्रशाळा तळाशेत शाळेने विविध स्पर्धेत सहभागी होऊन यश संपादीत करून शाळेचे व गावाचे नाव उंचावले आहे.

या वेळी तळाशेत शाळेने लहान गटात समूह गायन -प्रथम क्रमांक, पथनाट्य -द्वितीय क्रमांक, लंगडी -द्वितीय क्रमांक, शिल्पकाम - सानिध्या सहस्त्रबुद्धे (तृतीय क्रमांक) मिळवून लंगडी लहान गटात शाळेतील पाच मुलींची तालुका संघात निवड झाली आहे. तसेच तालुका स्तरीय परसबाग निर्मिती स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवलेला आहे.

केंद्राचे केंद्रप्रमुख गणेश ढेपे, शाळा मुख्याध्यापिका भिंगारे जि. प. सदस्या स्वाती नवगणे, गटशिक्षणाधिकारी तांबट, सरपंच रोशनी नवगणे आदींनी विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# रविवारी पद्मदुर्ग जागर सोहळा

## मंत्री, खासदार आमदारांची लाभणार उपस्थिती

**मुरूड : प्रतिनिधी**

पद्मदुर्ग जागर व गड संवर्धन संस्था मुरुड व कोकण कडा मित्र मंडळ रायगड सर्व संलग्न शिवप्रेमी संस्था यांच्या वतीने पद्मदुर्ग किल्लात पद्मदुर्ग जागर सोहळाचे आयोजन रविवारी (दि.५) करण्यात आले आहे.



या कार्यक्रमाला रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री- भरत गोगावले, जिल्हाचे खासदार सुनील तटकरे, मुरूड अलिबाग रोहा मतदार संघाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रमुख उपस्थिती होणार आहे. या निमित्त पुरातत्व विभाग मुरुड -बजरंग एरिकर, बंदर निरीक्षक मुरुड प्रमोद राऊळ, तहसीलदार रोहन शिंदे, पोलिस निरीक्षक नामदेव बंडगर, आदींची उपस्थिती असणार आहे.

रविवारी सकाळी ६ वाजता मुरुड राधाकृष्ण मंदिरा जवळील समुद्र मार्ग बोटीतुन पद्मदुर्ग किल्लात पालखी प्रस्थान, सकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत गड सजावट, सकाळी १० वाजता गडदेवता पुजन, सकाळी ११ते दुपारी १ वाजेपर्यंत व्याख्यान, शिवपालखी सोहळा, मर्दानी खेळ, दुपारी १ ते २ वाजेपर्यंत महाप्रसाद, दुपारी २ वाजता पद्मदुर्ग ते बोटीतुन प्रस्थान मुरूडकडे प्रस्थान होणार आहे.

दुर्ग शिवरायांचा आपल्या स्वाभिमानाचा एक दिवस इतिहासाचा साक्षी होण्यासाठी शिवप्रेमींनी सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन पद्मदुर्ग जागर व गड संवर्धन सामाजिक संस्था, मुरूडचे अध्यक्ष आशिलकुमार ठाकुर व कोकण कडा मित्र मंडळ रायगड अध्यक्ष सुरेश पवार यांनी केले. तसेच शिवप्रेमीना किल्लात जाण्यासाठी व येण्यासाठी बोटीची व्यवस्था खोरा बंदर, डोंगरी, मुरूड येथुन करण्यात आली आहे.

# ज्येष्ठ नागरिकांसंदर्भात प्रबोधन; पथनाट्यातून जनजागृती

**रेवदंडा : प्रतिनिधी**

नेहरू युवा केंद्र रायगड अलिबाग आणि ओएसिस बहुउद्देशीय समाजाभिमुख संस्था रेवदंडा अलिबाग रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने नववर्षाच्या पूर्वसंध्येला अलिबाग मुरूड तालुक्यातील गावांमध्ये ज्येष्ठ नागरिकांसंदर्भात जनजागृती करण्यात आली.

जिल्हा युवा समन्वयक निशांत रौतेला यांच्या मार्गदर्शनांतर्गत तसेच संस्थापक अध्यक्ष प्रतिक कोळी यांच्या नेतृत्वाखाली जुनं ते सोनं या शीर्षकाखाली पथनाट्य सादर करून, त्याद्वारे ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या, त्यावरील पर्यायी उपाय, घरातील व समाजातील ज्येष्ठ नागरिकांची जागा आणि महत्व, शासनाकडून योजना रूपाने मिळणारी मदत याबाबत सांगोपांग प्रबोधन करण्यात आले.

हा प्रबोधन उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिक कोळी, दर्श नागोटकर, मल्लिनाथ जमादार, सार्थक गायकवाड, सिद्धांत ठाकूर, वेदांती पाटील, प्रगती कासार, प्रतिक पाटील यांनी यशस्वी सहभाग नोंदवला.



# खरोशी शाळेचे विविध स्पर्धेत यश

## * १४ बक्षिकांसह अव्वल स्थान

**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती पेण यांच्या संयुक्त विद्यमाने खरोशी-केंद्रातर्फे आयोजित क्रीडा व व्यक्तीमत्त्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सुयश मिळवून १४ बक्षीसे जिंकून केंद्रात अव्वल स्थान पटकावला.



प्रभाकर पाटील फार्म हाऊस वळक येथे केंद्रप्रमुख प्रफुल्ल सुखचैन यांच्या उत्तम नियोजनात सर्व खरोशी केंद्रातील शिक्षकांच्या सहकार्याने या स्पर्धेत बेचकी प्रकार, लंगडी दोरी उडी, लगोरी, पारंपारिक नृत्य व समूहगीत गायन शिल्पकला पथनाट्य यांचा समावेश होता. यामध्ये खरोशी शाळेने बेचकीने नेम धरणे शिल्पकला समूहगान पारंपारिक नृत्य, लगोरी, पथनाट्य शून्य कचरा व्यवस्थापन या विविध स्पर्धा मध्ये लहान व मोठ्या गटात प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावून घवघवीत यश प्राप्त केले.

प्रारंभी क्रीडा ज्योत पेटवून व सरस्वती मातेच्या प्रतिमेस पुष्पमाला घालून स्पर्धेचे दीप प्रज्वलन रायगड जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी सुनिल भोपळे प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.खरोशी शाळेने आतापर्यंत आदर्श उत्कृष्ट शाळा प्रथम क्रमांक मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा तालुकास्तरीय द्वितीय क्रमांक, आदर्श शाळा पुरस्कार प्राप्तझाले असून शाळेची उत्तम प्रगती करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक किशोर म्हात्रे, सहकारी शिक्षक सदानंद पाटील, अदिती चेऊलकर उदय म्हात्रे, राजेंद्र शिंदे, ज्योती एकशिंगे पूजा तोगडे यांनी मार्गदर्शक व व्यवस्थापक यांची भूमिका बजावली.

या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गणपत पाटील, उपाध्यक्षा प्रिती पाटील व सदस्य सरपंच रुपाली पाटील, उपसरपंच प्रणाली घरत यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले.

# रायगड जिल्ह्यात रंगताहेत पोपटी पार्ट्या

## वेगवेगळ्या लज्जतदार प्रकारांना मागणी

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

थर्टी फर्स्टचे बेत सर्वत्र रंगू लागले आहेत आणि या थर्टी फर्स्ट ला पोपटी पार्टी शिवाय रंगत नाही. शिवाय पर्यटकांचा राबता देखील रायगड मध्ये मोठ्या प्रमाणात येऊ लागला आहे आणि या पर्यटकांना देखील पोपटीची टेस्ट भारी आवडते. रायगड जिल्ह्यात पोपटी प्रसिद्ध आहे. सध्या येथे पोपटीचे वेगवेगळे ट्रेंडदेखील सुरू आहेत आणि या अनोख्या प्रकारच्या पोपटीची मागणीदेखील खूप आहे. शाकाहारी व मांसाहारी पोपटी उपलब्ध आहे.

विदर्भात, खानदेशात ज्याप्रमाणे ज्वारी व बाजरीच्या कणसांना भाजून केलेला हुरडा प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणेच जिल्ह्यामध्ये गावठी वालाच्या शेंगांची वैशिष्टयपूर्ण व लज्जतदार पोपटी प्रसिद्ध आहे. वालाच्या शेंगा भामरुडाच्या (भांबुर्डी) पाल्यात मडक्यामध्ये मोकळ्या आगीवर विशिष्ट पद्धतीने शिजवल्या जातात. यालाच पोपटी असे म्हणतात. काही ठिकाणी मडक्या ऐवजी पत्र्याचा डब्बा सुद्धा वापरला जातो. पोपटीत वालाच्या शेंगांबरोबर कांदा, बटाटा, रताळी तसेच अंडी, चिकन, मसाळी व चिंबोऱ्या घालून लज्जत वाढवली जाते. वालाबरोबर मटारच्या शेंगा देखील टाकतात. ठिकठिकाणी शेतावर तसेच मोकळ्या जागेवर, फार्म हाऊस व घराबाहेर मोकळ्या जागेत आदी ठिकाणी या पोपटी पार्ट्यांची धूम पाहायला मिळते. काही ठिकाणी काव्यसंमेलन रंगतात तर गप्पा गोष्टींच्या मैफिलीमध्ये सुखदुःखाची देवाणघेवाणही होते.

**शेतात लावलेल्या पावट्याच्या शेंगा वापरून पोपटी बनवली आहे. कारण अजून गावठी वालाच्या शेंगा येण्यास अवकाश आहे. पोपटी पार्टीच्या निमित्ताने घरातील सर्व मंडळी एकत्र येतात. महिला, जेष्ठ व लहानमुले विशेष आनंद घेतात. पोपटीचा आस्वाद घेता घेता गप्पा गोष्टी रंगतात. या हंगामात दरवर्षी कुटुंबियांसोबत पोपटीचा बेत केला जातो.**

**-मयुरी रूपेश ठोंबरे**, पाली

**रायगड जिल्ह्यातील पोपटी हे विशेष खाद्य आहे. शिवाय वेगवेगळ्या प्रकारांमध्ये ते उपलब्ध आहे. थर्टी फर्स्टसाठी खास पोपटीचा बेत आखला जात आहे. जिल्ह्या बाहेरून येणारे पर्यटकांना पोपटी खूप आवडते. रोजगारालादेखील चालना मिळते.**

**-उमेश तांबट, पर्यटन व्यावसायिक, सुधागड**

याशिवाय येथील काही हॉटेल व कॉटेज व्यवसायिकांनी आपल्या मेनूमध्ये पोपटीचा समावेश केला आहे. सध्या पर्यटनाचा हंगाम सुरू असल्याने पर्यटकदेखील पोपटीची मजा लुटतात. त्यामुळे व्यवसायदेखील चांगला होतो, असे सुधागड तालुक्यातील हॉटेल व्यावसायिक आश्रय काटकर यांनी सांगितले.






















पनवेल : नवीन वर्षाला सुरुवात झाली आहे. त्यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी.देशमुख, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांना शुभेच्छा दिल्या. जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, भुपेंद्र पाटील, प्रभाकर जोशी, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, माजी सरपंच सुनील माळी, शुभ पाटील, ‘रयत’चे पीआरओ बाळासाहेब कारंडे, नरेश मोकल, वैभव गावंड, करण म्हात्रे, संतोष गुजर, सी.एल.ठाकूर, संजय जाधव, अशोक आंबेकर, यांच्यासह अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.






उरण पंचायत समिती, शिक्षण विभाग व श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालय, द्रोणागिरी ता. उरण, जि. रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने

# उरण तालुका विज्ञान प्रदर्शन २०२४- २०२५

**शुक्रवार दि. ३ जानेवारी २०२५ ते शनिवार दि. ४ जानेवारी २०२५**

**सस्नेह निमंत्रण**

आपल्या उरण तालुक्यातील उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अशा सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शासन मान्य शाळांचे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन शुक्रवार, दि. ३ जानेवारी २०२५ ते शनिवार, दि. ४ जानेवारी २०२५ रोजी संपन्न होत आहे. तरी आपण विज्ञान प्रदर्शनास भेट देऊन बालवैज्ञानिकांचे कौतुक करुन उपकृत करावे.

**उद्घाटन समारंभ**
शुक्रवार दि. ३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० वा.

**उद्घाटक**
**मा. श्री. महेश बालदी साहेब**
(आमदार उरण विधानसभा मतदारसंघ)

**कार्यक्रमाचे अध्यक्ष**
**मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब (माजी खासदार)**
चेअरमन, ज. भ. शि. प्र. संस्था पनवेल

**प्रमुख मान्यवर**
**मा. श्रीम. पुनिता गुरव** शिक्षणाधिकारी (प्राथ.) रा.जि.प. अलिबाग
**मा. श्री. महारुद्र नाळे** शिक्षणाधिकारी (माध्य.) रा.जि.प. अलिबाग
**मा. श्री. समीर वाठारकर** गटविकास अधिकारी, पं.स. उरण
**मा. श्री. उद्धव कदम** तहसिलदार, तहसिल कार्यालय उरण
**मा. श्री. संतोषसिंग डाबेराव** सहायक गटविकास अधिकारी, पं.स. उरण
**मा. श्री. वाय. टी. देशमुख** उपकार्याध्यक्ष, ज. भ. शि. प्र. संस्था
**मा. श्री. चंद्रकांत घरत** चेअरमन, श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालय

**पारितोषिक वितरण समारंभ**
शनिवार दि. ४ जानेवारी २०२५ रोजी सायं.: ३ ते ५ वा.

**कार्यक्रमाचे अध्यक्ष**
**मा. श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे साहेब**
(आमदार, कोकण शिक्षक मतदार संघ)

**प्रमुख पाहुणे**
**मा. श्री. वाय. टी. देशमुख** उपकार्याध्यक्ष, ज.भ.शि.प्र. संस्था
**मा. श्री. समीर वाठारकर** गटविकास अधिकारी, पं.स. उरण
**मा. डॉ. श्री. एस.टी. गडदे** सचिव, ज.भ.शि.प्र. संस्था
**मा. श्री. जितेंद्र मिसाळ** वरिष्ठ पोलीस निरीक्षक

**आपले विनित**
**मा. श्रीमती प्रियांका म्हात्रे** गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती उरण
**मा. श्रीम. अनुराधा काठे** प्राचार्या, श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालय
**मा. श्री. रामचंद्र शिंगाडे** प्रशासन अधिकारी नगरपालिका उरण
**मा. श्री. गोपाळ जाधव** केंद्रप्रमुख चिर्ले
**मा. श्रीम. निर्मला घरत** केंद्रप्रमुख जसखार
**मा. श्री. शंकर म्हात्रे** केंद्रप्रमुख शेवे
**मा. श्री. बबन पाटील** केंद्रप्रमुख कोप्रोली
**मा. श्री. अविनाश नवाळे**, केंद्रप्रमुख चिरनेर

सर्व कर्मचारी शिक्षण विभाग, समग्र शिक्षा अभियान पं.स. उरण, गणित-विज्ञान अध्यापक मंडळ उरण, सर्व शिक्षक संघटना उरण, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, विषय साधनव्यक्ती, आ.ई.डी., सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक शाळा ता. उरण, जि. रायगड

**स्थळ**
**श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालय द्रोणागिरी, ता. उरण, जि. रायगड**










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com